| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक २२ वा | बुधवार दिनांक २५ मार्च, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### लैंगीक अत्याचाराच्या दोन घटना: पोलिसात गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)-लोहारा पोलीस ठाणे अंतर्गत २४ वर्षीय महिला (न एप्रिल २०२३ ते दि१९.०३.२०२६ रोजी हिस एका गावातील एका तरुणाने बेशुध्द करुन जबरीने शारीरक संबंध ठेवून छायाचित्र काढुन ते व्हायरल करण्याची धमकी देवून व तुझे खात्यावर १० लाख रुपये टाकुन देतो असे फिर्यादीस आमिष दाखवून वेळोवेळी वेगवेगळ्या लॉजवर घेवून जावून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. नमुद पिडीत ही त्याचे ऐकत नाही हे पाहुन छायाचित्र पिडीतेच्या पतीचे मोबाईलवर पाटवून बदनामी केली. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.२३.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४, ६४(१), ३५२, ३५२, ३५६(२) सह कलम ६७ माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

तसेच दुसऱ्या एका घटनेत तुळजापूर पोलीस ठाणे अंतर्गत २१ वर्षीय मुलगीस सन २०२४ ते सन २०२६ रोजी हिस एका गावातील एका तरुणाने लग्नाचे अमिष दाखवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. दुसऱ्या मुलीसोबत साखरपुडा करुन पिडीतीची फसणुक केली. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.२३.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ९३२ कॉपर वायरची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी जगन्नाथ आप्पाराव नरवडे, वय ५३ वर्षे, रा. जवळगा मेसाई ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची अंदाजे ६५,२४० किंमतीची पाणबडी मोटारचे एकुण ९३२ मिटर कॉपर वायर हे दि.२२.०३.२०२६ रोजी देवसिंगा साठवण तलाव जवळगा शेतशिवार येथुन फिर्यादी व गावातील शेतकरी यांचे साहित्य अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- जगन्नाथ नरवडे यांनी दि.२३.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल.

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत समाधान रा. आरसोली ता.भुम जि. धाराशिव यांनी दि २३.०३.२०२६ रोजी १८.४५ वा. सु.सई किराणा ॲन्ड जनरल स्टोअर्स आरसोली येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ गुटखा, पानमसाला, तंबाखु असा एकुण २,४५५ किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला भुम पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम- २२३, २७४ सह २६(२)(i), २६(२)(iv), २७(३), (D), २७ (३) (ए) अन्वये भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## जिल्हा महसूल क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धा

# क्रीडा-सांस्कृतिक उपक्रमातून संघभावना आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना - जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार



धाराशिव (जिमाका)-क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये संघभावना,शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो.दैनंदिन कामकाजातील ताणतणावातून मुक्तता मिळून सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास घडण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले.

धाराशिव येथील श्री तुळजाभवानी जिल्हा क्रीडा संकुलात २२ व २३ मार्च रोजी जिल्हा महसूल क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून,या स्पर्धेचे उद्घाटन रविवार,२२ मार्च रोजी जिल्हाधिकारी पुजार यांच्या हस्ते संपन्न झाले.यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व व्यासपीठावर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, पोलिस अधीक्षक रितु खोखर,अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील तसेच निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले.

पुढे बोलताना जिल्हाधिकारी पुजार यांनी सांगितले की,महसूल विभागाच्या माध्यमातून अधिकारी व कर्मचाऱ्यांना विविध क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि कलागुणांना वाव देणाऱ्या उपक्रमांत सहभागी होता येत आहे.त्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढून प्रशासन अधिक सक्षम व गतिमान होण्यास मदत होणार आहे.

या प्रसंगी उपविभागीय अधिकारी सर्वश्री.ओंकार देशमुख,रेवैयाह डोंगरे,दत्तू शेवाळे तसेच तहसीलदार मृणाल जाधव,अरविंद बोळगे, गोविंद येरमे,जयवंत पाटील,निलेश काकडे,प्रकाश म्हेत्रे,हेमंत ढोकले आणि रणजितसिंह कोळेकर यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धांमध्ये १०० मीटर व २०० मीटर धावणे,लांब उडी,उंच उडी, थाळी फेक,भाला फेक,गोळा फेक, ३ किमी चालणे यांसारख्या मैदानी स्पर्धांसह क्रिकेट, व्हॉलीबॉल, थ्रो बॉल, बॅडमिंटन, रिंग टेनिस,खो-खो, कबड्डी, बुद्धिबळ, कॅरम व टेबल टेनिस अशा विविध क्रीडा प्रकारांमध्ये महसूल कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला आहे.

# तुळजापुरात अद्यावत वातानुकूलित नाट्यगृह उभारणार !-आमदार राणाजगजितसिंह पाटील



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या तुळजापूर शहराला लाभलेला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा अधिक समृद्ध करण्यासाठी, तसेच स्थानिक कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी तीर्थक्षेत्र तुळजापूर येथे लवकरच सर्व सोयींनी युक्त असे पूर्णतः वातानुकूलित भव्य आणि अद्यावत नाट्यगृह उभारणार असल्याची अशी ग्वाही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. त्यामुळे तुळजापूर आणि परिसरातील नाट्य चळवळीला मोठी उभारी मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

'पंचरंग प्रतिष्ठान' आयोजित 'श्री क्षेत्र तुळजापूर राज्यस्तरीय पंचरंग करंडक एकांकिका लेखन स्पर्धा २०२५-२६' चा पारितोषिक वितरण आणि निवडक एकांकिकांच्या अंकुर या संग्रहाचा प्रकाशन सोहळा हॉटेल स्कायलँड येथे अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला आमदार पाटील यांनी ऑनलाईन माध्यमातून उपस्थित राहून नवोदित लेखकांच्या सृजनशीलतेचा गौरव केला. यावेळी बोलताना आमदार राणाजगजितसिंह पाटील म्हणाले, आई तुळजाभवानीच्या पावन भूमीत साहित्याचा जागर होणे ही अभिमानास्पद बाब आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने निवडक एकांकिका संहितांचा 'अंकुर' हा संग्रह पुस्तक स्वरूपात प्रकाशित करण्यात आला. नवोदित लेखकांना संधी उपलब्ध करून देऊन दर्जेदार नाट्य साहित्य रंगभूमीपर्यंत पोहोचवणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. तुळजापूरची ही साहित्यिक आणि सांस्कृतिक पताका अशीच उंच फडकत राहणार असल्याचे सांगत आमदार पाटील यांनी आयोजक, पंचरंग प्रतिष्ठानच्या कामाचे यावेळी कौतुकही केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभाग प्रमुख, ख्यातकीर्त सिने गीतकार तथा प्रसिद्ध कवी व नाट्य लेखक प्रा. डॉ. दासू वैद्य उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने सोहळ्याची उंची अधिकच वाढली. व्यासपीठावर तुळजापूरचे नगराध्यक्ष श्री. विनोद पिटू गंगणे, उपनगराध्यक्ष श्री. रामचंद्र आबा रोचकरी, प्रसिद्ध अभिनेते श्री. उमेश जगताप, श्री. शंतनू गंगणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी पंचरंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीकांत आप्पा नाडापुडे, सचिव प्रा. संभाजीराव भोसले, उपाध्यक्ष सचिन घोडके, स्पर्धा संयोजक महेश धुमाळ आणि दिग्विजय भोसले यांच्यासह नाट्य व साहित्य क्षेत्रातील रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्व विजेत्या लेखकांचे आणि 'अंकुर' संग्रहात स्थान मिळवलेल्या साहित्याचे यावेळी मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. तसेच विविध क्षेत्रात लौकिकस्पद कामगिरी बजावल्याबद्दल सरोजा नरेश अमृतराव, नीता दिनेश क्षीरसागर डॉ. शिवतेज संभाजी भोसले, डॉ. निविता नारायण नन्नवरे कु. सृष्टी धनंजय पाटील, प्रा. ऋतुजा अनिल रोचकरी, चि. कासिफ ख्वाजा सय्यद, श्री. स्वप्नील ऋषीकांत भोसले, डॉ. रिया राजेश शिंदे, कु. भक्ती सुधाकर उळेकर, चि. शिवतेज सुधाकर उळेकर, चि. तुषार तुळसीदास साखरे, कु. आदिती सचिन घोडके, चि. रुहान शंतनू गंगणे, कु. श्रुती राजेश चोपदार, चि. आयुष राजेश जगताप वरील सर्व मान्यवरांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

### मोटारसायकलची चोरी

वाशी (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी तेजस विलास भोरे, वय २५ वर्षे, रा. वडवणी ता. जि.बीड यांची अंदाजे ७०,००० किंमतीची मोटरसायकल फिर्यादीचे हॉटेलवरील कामगार कल्याण रा. कर्जणी ता.जि. बीड यानी दि.१९.०३.२०२६ रोजी हॉटेलसमोर ईट येथुन चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी तेजस भोरे दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# पीसीपीएनडीटी अंतर्गत जिल्हा सल्लागार समितीसाठी स्वयंसेवी संस्थांकडून अर्ज आमंत्रित

धाराशिव, (जिमाका)-जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, धाराशिव यांच्यावतीने Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques (PCPNDT) Act अंतर्गत जिल्हास्तरावर कार्यरत जिल्हा सल्लागार समितीवर सदस्य म्हणून काम करण्यासाठी पात्र व इच्छुक स्वयंसेवी संस्था (NGO) कडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

या समितीवर सदस्य म्हणून काम करण्यासाठी अर्ज करणाऱ्या संस्थांनी शासनमान्य नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.तसेच महिला व बालकल्याण,आरोग्य,जनजागृती आदी क्षेत्रात कामाचा अनुभव असणे बंधनकारक असून संबंधित क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक आहे.

अर्जासोबत संस्था नोंदणी प्रमाणपत्र, मागील कामाचा अहवाल किंवा अनुभव प्रमाणपत्र,संस्थेची सविस्तर माहिती (प्रोफाईल) तसेच इतर आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

इच्छुक संस्थांनी आपले अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रांसह २८ मार्च २०२६ पर्यंत जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय,धाराशिव येथे सादर करावे. प्राप्त झालेल्या अर्जांपैकी संबंधित समितीवर नियुक्ती करण्याचे सर्वस्वी अधिकार धाराशिव येथील (PCPNDT) जिल्हा सल्लागार समितीकडे राहतील.

नियुक्त करण्यात येणाऱ्या सदस्यांना कोणत्याही प्रकारचे मानधन,भत्ता किंवा पगार देय राहणार नसल्याची नोंद घेणे आवश्यक आहे.अशी माहिती जिल्हा शल्यचिकित्सक तथा जिल्हा समुचित प्राधिकारी डॉ. धनजय चाकुरकर यांनी दिली.

# महाडीबीटीवरील प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज २८ मार्चपूर्वी निकाली काढा: सहाय्यक आयुक्तांचे महाविद्यालयांना आवाहन

धाराशिव, (जिमाका) सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी महाडीबीटी प्रणालीवरील प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज दिनांक २८ मार्च २०२६ पूर्वी निकाली काढावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,धाराशिव श्री.सचिन कवले यांनी केले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत देण्यात येणाऱ्या भारत सरकार शिष्यवृत्ती,शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती,राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक पाठ्यक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता अशा विविध योजनांसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया http://mahadbtmahit.gov.in या संकेतस्थळावरून दिनांक ०१ जुलै २०२५ पासून सुरू करण्यात आली आहे.महाडीबीटी प्रणालीवरील डॅशबोर्डच्या पाहणीनुसार सन २०२५-२६ साठी एकूण ७४३२ विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केले असून त्यापैकी १२५४ अर्ज अद्याप महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत.

या संदर्भात महाविद्यालयांना वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या असतानाही संबंधित प्राचार्यांनी अद्याप अर्जांची पडताळणी करून ते सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाकडे सादर केलेले नाहीत.

त्यामुळे सर्व महाविद्यालयांनी ऑनलाईन प्राप्त अर्जांची शासन निर्णयातील निकषांनुसार सखोल छाननी करून पात्र अर्ज दिनांक २८ मार्च २०२६ पूर्वी समाज कल्याण कार्यालयाकडे अग्रेषित करावेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

विहित मुदतीत अर्ज निकाली न काढल्यास अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू शकतो. अशा परिस्थितीत त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यार्थी यांची राहील,याची गांभीर्याने नोंद घ्यावी, असेही श्री.सचिन कवले यांनी कळविले आहे.

# आळणी गावाचा अभिमान; डॉ. दिव्या वीर हिला एमबीबीएस पदवी प्रदान



धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव तालुक्यातील आळणी येथील डॉ. दिव्या अरुण वीर यांनी भारती विद्यापीठ मेडिकल कॉलेज मधून एमबीबीएस पदवी संपादन केली. ग्रामीण पार्श्वभूमीतून येत त्यांनी जिद्द व परिश्रमाच्या जोरावर डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण केले. त्यांच्या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण असून ग्रामस्थांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

डॉ. दिव्या वीर ही दिव्यंगत माजी सरपंच अरूण (पापा) वीर यांची सुकन्या असून आळणी गावचे विद्यमान सरपंच प्रमोद वीर यांची ती पुतणी आहे.

# ३ लाख ६८ हजार जनावरांना देणार लाळ खुरकत लस: निपाणी येथे जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत लसीकरण शिबिराचे उदघाटन

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- आकांक्षित जिल्हा कार्यक्रमांतर्गत यन २०२६ मध्ये राबवल्या जाणाऱ्या 'संपूर्णता अभियान २.०'अंतर्गत राज्यातील मागास जिल्ह्यांत लाळ-खुरकत लसीकरणाला सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे. हे अभियान दि. २८ जानेवारी ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान राबवले जाणार असून, धाराशिव जिल्ह्यातील गाय व म्हैसवर्गीय ०३ लाख ६८ हजार ०४१ जनावरांना लाळ खुरकतची लस दिली जाणार आहे. आकांक्षित जिल्हा २.० अभियानांतर्गत गाय-म्हैसवर्गीय जनावरांचे लसीकरण शिबिराचे उद्घाटन कळंब तालुक्यातील निपाणी येथे जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडले. या वेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा उप आयुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय धाराशिवचे डॉ. धनंजय महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. १८ मार्चला निपाणी येथे लाल खुरकत लसीकरण शिबिराला सुरुवात झाली. या वेळी निपाणीसह परिसरातील पशुपालक शिबिरास उपस्थित होते. या वेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी संपूर्णतः अभियान २.० अंतर्गत पशुसंवर्धन विभागातर्फे राबवण्यात येणाऱ्या लाळ खुरकूत लसीकरणाचा सर्व पात्र पशुपालकांनी लाभ घ्यावा असे आवाहन धाराशिवचे जिल्हा उप आयुक्त पशुसंवर्धन डॉ. धनंजय महाजन यांनी केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## खरात प्रकरणी, दोषी कोणाला धरावे?

राज्यात सध्याला कॅप्टन अशोक खरात प्रकरण गाजत आहे. बाकीचे यापुर्वीचे सर्व प्रकरण थंड झाले आहेत, त्याची चर्चाच होत नाही. मात्र अशोक खरात बाबत वृत्तपत्रातून, टिव्ही व सोशलमिडीयातून भरमसाठ बाबी उघडकीस येत आहेत. मुळात पहिला प्रश्न असा आहे की, रुपाली ह्या महिलांना न्याय देणाऱ्या जर भोंदूच्या विळख्यात आडकल्या असतील तर न्याय कोणाकडे मागावा. दुसरे या खरातचे कारनामे हे ताजे नाहीत, तो अनेक वर्षापासून चाळे करीत असणार, त्याच प्रमाणे त्याने जे मायाजाळ निर्माण केले आहे हे एका दिवसात केलेले नाहीत. त्याने राजकिय नेत्याशी संबंध एका दिवसातील नाही. हे पहिल्यांदा लक्षात घेतले पाहिजे. त्याचे कारनामे अनेक दिवसापासूनचे आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. अनेक वर्षापासून बिनबोबाट चाललेले असावेत. धार्मिकतेच्या आडून आज पर्यंत अनेकांनी जनतेची फसवणुक केलीच आहे. खरात हा पहिल्यांदा हाती लागला किंवा देशातील-राज्यातील पहिले प्रकरण आहे असे नाही. अनेक लैगिक शोषण करणारे कथित बाबांना यापुर्वी पकडले आहेत, त्यांना जेलमध्ये डांबले आहे. आजही जेलची हवा खात आहेत. असंख्य जनता त्यांच्या पाया पडते. पाय धुते, तिर्थ म्हणून पिते. जनता मुर्ख का बुवा मुर्ख? याचा विचार जनतेनी केला पाहिजे. संत गाडगे महाराज यांनी किती तरी आपल्या ओजस्वी किर्तनात सांगितले. कुणाच्या पाया पडावे, कुणाची पुजा करावयची! संत तुकाराम महाराजांनी जनतेला सावध करण्याचा प्रयत्न केला आहे. देशात जेवढी ढोंगी बाबा सापडले हे गरीब नाहीत, लाखो-करडोंची संपत्ती कमावली आहेत. नको ते नाद दिसून आले आहेत. भोळी मंडळी जणू पायाघडा घालून तयार आहे. भोंदू स्वर्गासारखे जीवन जगताना पाहिले आहे. त्यातील हा एक खरात आहे. ''दुनिया झुकती है। झुकाने वाला होना चाहिए'' असे काम केले आहे. मंत्राने किंवा जादूने मुले होत नसतात. पैसा कमविण्यासाठी कष्ठ केले पाहिजे. कष्ठविना काही नाही. हे माहिती नाही असे नाही सर्वांना कळते. शॉर्टकट् मार्गाने कमाईच्या मागे लागले तर काय होणार? त्याच प्रमाणे आज महिला बळी पडल्या आहेत. पुरूष यात आडकले नाहीत. महिलांना सहज धार्मिकतेच्या आडून आडकविता येते हे खरातला माहिती असेल. असे जादूटोण्याचे लेकरे होत असते तर लग्न करण्याची गरज भासली नसती. शरिरात काय दोष आहेत. पुरूष किंवा महिलेत दोष असेल तर मुले होत नसतात. समाजात अनेक महिलांना लकरे अभावी जीवन जगतात. दत्तक घेतात. कुटुंबातील घरातील कोणाचे तरी दत्तक घेतात. ही परंपरा आहे. त्याकडे न वळता खरात याच्या नादाला लागून काय साध्य केले. विश्वास वा अंध विश्वास यात फरक आहे. घात व विश्वासघात यातील फरक ओळखले पाहिजे. जो ओळखतो तोच वाईटास बळी पडत नाहीत. समाजात वाईट विचाराची मंडळी आहे. त्यापासून सावध राहीले पाहिजे. वाईटचा नादाचा शेवट वाईट होतो हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे ईश्वराने प्रत्येकाला बुद्धी दिली आहे, विचार करण्याची क्षमता दिली आहे तीचा वापर केला पाहिजे. बुद्धी गहाण ठेवून वागला तर नशीबी चांगले येणार नाही. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी यात लक्ष घातले म्हणून ठिक नसता तो ही परदेशात पळून गेला असता. अतिषय गोपनियात ठेवून खरातला ताब्यात घेतले गेले. त्यामुळे पिडीत मंडळी पुढे आली. पोलिसांना जे हाती लागले तो पुरावा मोठा आहे. त्यामुळे हा खरात अनेक वर्ष जेलमध्ये सडला जावू शकतो. जनतेनी पुढे आले पाहिजे. राज्य सरकारने पिढीतांना संरक्षण व विश्वासात घेतले पाहिजे. तरच पिढीत मंडळी समोर येवू शकेल. नसता प्रकरण जिरले जावू शकते. यात जे कोणी आडकले आहे ते आता पर्यंतच्या पाहाणीत उच्चभ्रु मंडळींचा समावेश आहे. मुळात नागरिकांना ईश्वर समजला नाही किंवा जमजून घेण्याचा प्रयत्न केला नाही. चुकीला मोठे मानले जाते हे योग्य नाही. मुळात चांगल्या बाबीचा स्वाध्याय नाही म्हणून वाईटाला बळी पडतात. राज्यात अशाप्रकारे अप्रिय बाबीला बळी पडतात. खरात हा लहान माणूस नाही. अनेका उच्च मंडळीशी संबंध जुळविले होते. अनेकांना जाळ्यात ओढून तो गैरकृत्य करीत होता. यात तो एकटा नाही हे लक्षात घेतले पाहिजे. बाकीचे साथीदार हे सहआरोपी म्हणून गुन्हे दाखल केले पाहिजेत. यात मोठी मासे असल्याने दिसून येत आहे. चाकणकर सारखी व्यक्ती जी महिलांना न्याय देणारी तीचे जर खरात सोबत मैत्री असेल तर न्याय कोणाकडे मागवा. त्यांनी राजीनामा दिला आहे. मुख्यमंत्र्यांनी लक्ष घातले. अधिकाऱ्यांना साथ दिली, अभय दिले म्हणून खरात यांना ताब्यात घेतले आहे. किमान चौकशी तरी चालू आहे. पिढीत समोर येत आहेत. सध्याला तो जेलमध्ये आहे हे सर्वात महत्त्वाचे आहे. या प्रकरणी मुख्यमंत्र्याचे धाडस म्हणावे, कारण मोठ्या माणसाला बेड्या घालणे अधिकाऱ्याला आवघड असते. पुर्वी याप्रकरणी वृत्तपत्राने बातमी छापली त्याच्यावर दबाब आला. हे नंतर उघडे पडले. वास्तविक वृत्तपत्रातून येणाऱ्या वृत्ताकडे आलिकडे दुर्लक्ष होत आहे. अधिकारी मंडळी लक्ष देत नाहीत. पुर्वी दररोज बातम्याचे कात्रण होत असत, ते संबंधितास पाठविले जात असत. खुलास देत असत, आता ती पद्धत लोप पावली की काय असे वाटत आहे. जनतेला अभय मिळत नाही. जनतेची गऱ्हाणीची दखल घेतली जात नाही. ज्या वृत्तपत्रात खरात विषयी बातमी छापली त्याची दखल त्याच वेळी घेतली असती तर काही महिलांची किमान अब्रु तरी वाचविता आली असती. केवळ दुर्लक्ष केलेल्याचा परिणाम दिसून येत आहे. मुख्यमंत्र्यांनी दखल घेतली, वरिष्ठांना अभय दिले म्हणून गैरकृत्य उघड पडले. आता सखोल चौकशीची गरज आहे. मुळात सरकार करेल याकडे कल असतो. जनतेची काही जबाबदारी असते ती पार पाडली पाहिजे. सरकारचे लक्ष दिले पाहिजे की, हा कॅप्टन माणूस एवढ्या मोठ्या प्रमाणात माया कशी जमावत होतो. महागाड्या गाड्या, उच्चभ्रूंची ये-जा, नेत्यांचे वाढते प्रेमाची कहाणी विनावे वरिष्ठांना कळविले पाहिजे. सरकारने आता जनतेला जाहिर आवाहन केले पाहिजे की, चुकीचा मार्ग कोणी आवलंब असेल किंवा देशविरोधी काम करीत असेल तर विनानावे, गुप्त माहिती कळविली पाहिजे. त्याची दखल घेतली पाहिजे. तरच जनता पुढे येईल. सरकार, पोलिस यंत्रणेस कळविले तर तपासास गती येवू शकेल, त्यमुळे सरकारने अभय दिले पाहिजे. आताखरात याच्यावर चौकशीचा फास आवळला जात आहे ही समाधानाची बाब आहे.

# दयानंद कला महाविद्यालय कलातीर्थ २०२६ चा वार्षिक स्नेहसंमेलनाचा थाटात प्रारंभ

### तंत्रज्ञान माहिती देईल, पण अनुभवाचे बोल फक्त शिक्षकच देऊ शकतात गुंजन पाटील



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद कला महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन 'कलातीर्थ २०२६'चे आयोजन करण्यात आले असून. या संमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध कवयित्री गुंजन पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी बोलताना गुंजन पाटील यांनी तंत्रज्ञान आणि मानवी अनुभव यातील फरक अधोरेखित केला. त्या म्हणाल्या की, ''एक मिनिटाच्या रिल्समध्ये शिक्षण आणि माहिती देणाऱ्या अनेक लिंक येतात. चॅट जीपीटी विचारलेली माहिती नक्कीच देते, पण अनुभवाचे बोल, जगाशी लढण्यासाठी लागणारी ताकद फक्त शिक्षकच देऊ शकतात. जबाबदारीचा भार कमी करण्याचे काम शिक्षकांमुळे शक्य होऊ शकते.'' यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनामध्ये संयम ठेवण्याचा सल्ला दिला. सोशल मीडियामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिप्रेशन, व्यसन आणि आत्महत्येचे प्रमाण वाढत असल्याने विद्यार्थ्यांनी कॅम्पस मधील प्रत्यक्ष मैत्री टिकवणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. श्रीमती गुंजन पाटील यांनी आपल्या अनेक कवितांमधून उपस्थितांच्या हृदयाला हात घातला. महाविद्यालयातील प्रेमाची जाणीव करून देताना त्यांनी खालील अनेक कविता सादर केल्या,

''पाहू नको रे मी असे वितळणार नाही,
माझ्या डोळ्यात एक घनदाट जंगल आहे,
तुला रस्ता कळणार नाही.''

प्रेमाबरोबरच अभ्यासाचे महत्त्व सांगताना त्या म्हणाल्या,

''प्रेमाचा सिल्याबस तुलाही अवघड कळता कळत नाही,
आणि
अर्ज तोपर्यंत करत राहायचं जोपर्यंत रिझल्ट मिळत नाही.''

विद्यार्थ्यांनी फिल्मी दुनियेतून बाहेर येऊन वास्तव जगावे,
असा संदेश त्यांनी या कवितेतून दिला.

''केवळ फिल्मी दुनियेत लागतो खजाना हाती
अमीर बापाची पटेल आपल्याला इतकं नशीब फळणार नाही.''

तरुणाईला कडक इशारा देताना त्यांनी म्हटले की,

''जरा मेहनत करा, प्रेमात सारे हिशोब तपासले जातात, कोणतीच लैला तुमच्यासाठी आयुष्य उजळणार नाही.'' तसेच, सध्याच्या काळातील प्रेमातील बदलत्या स्वरूपावर भाष्य करताना त्यांनी म्हटले,

''प्रेम आले तर येऊ दे गेलं तर जाऊ दे,
एकदा पारखून घे, ती घर तर जाळणार नाही.''

अशा शब्दांत त्यांनी प्रेमातील भ्रष्टाचारावर ओढलेले ताशेरे शिक्षकांसह विद्यार्थ्यांमध्ये ही दाद मिळवून गेली. अलीकडच्या काळातील परिस्थितीवर उपरोधिक टोला लगावताना त्या म्हणाल्या,

''खरंच पोरी धोकेबाज असतात,
आधी प्रेमात पडतात काही दिवस मजेत जगतात
मग, याला सोडून दुसऱ्या बरोबर जातात.''

स्त्री जीवनातील संघर्षाचे वर्णन करताना त्यांनी अत्यंत भावनिक ओळी सादर केल्या:

''बाईचं जीवन अवघड असतं इतकंच आईने सांगितलं.
ऐकून मीही आई झाले आणि कधीच काही नाही मागितलं.
लेक घरची अस्मत असते बाबा नेहमी सांगायचे,
मीही मुक्याने मान डोलवत कधी काही नाही मागायचे.''

या माध्यमातून त्यांनी स्पष्ट केले की, मुलींच्या हातात आज लॅपटॉप आला असला तरी समाजव्यवस्थेने त्यांच्या हातातील पोळपाट आणि लाटणे काढून घेतलेले नाही. ''ॲसिड टाकणारा हात पुरुषीच का असतो? आणि स्टोव्हच्या भडक्याने स्त्रीच का जळते?'' असे वास्तव वर्णन त्यांनी कवितेतून केले. यावेळी त्यांनी बारावी बोर्ड व विद्यापीठ परीक्षेतील विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे कौतुक केले. स्नेहसंमेलनात भारुड, लावणी, छक्कड, सामूहिक नृत्य आणि एकपात्री अभिनय अशा कलाप्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. रंगीबेरंगी रोषणाई आणि वाद्यांच्या तालावर विद्यार्थ्यांचा उत्साह अवर्णनीय होता. प्रा. डॉ. अंकुशकुमार चव्हाण व डॉ. सुधीर गाडवे यांनी पारितोषिक वितरणाचे वाचन केले. याप्रसंगी संमेलनाध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, स्नेह संमेलन प्रभारी प्रा. डॉ. रमेश पारवे, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, श्रीमती जयमाला गायकवाड, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, डॉ. संतोष पाटील, श्री. संजय व्यास यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. जान्हवी काळे व कु. एकता पुरोहित यांनी केले, तर आभार प्रदर्शन कु. रीशा जवळगेकर हिने मानले.

# विद्यार्थ्यांनो, सत्याची कास धरा : कवी प्रा. प्रशांत मोरे



**लातूर/प्रतिनिधी :** समाजात आज मोठ्या प्रमाणावर भोंदूगिरी वाढत चालली आहे. समाजात अनेक प्रश्न आहेत. जो व्यक्ती सत्याची कास धरून चालतो त्याला काहीच कमी पडत नाही. त्यामुळे विद्यार्थी मित्रांनो नेहमीच आपण सत्याची कास धरावी, असे प्रतिपादन मुंबई येथील सुप्रसिद्ध लोककवी प्रा. प्रशांत मोरे यांनी येथे बोलताना केले. दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या उत्कर्ष २०२५-२६ या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उदघाटन मंगळवारी संपन्न झाले. यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी मंचावर विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रमुख उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, विभाग प्रमुख डॉ. मनिषा आष्टेकर, डॉ. विशाल वर्मा, प्रा. ऋतुजा देशमुख, डॉ. सुभाष मोरे, डॉ. अशोक वाघमारे, डॉ. साईनाथ उमाटे, डॉ. शशिकांत स्वामी, डॉ. वैशाली सातपुते, अधीक्षक राजेश सेलूकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी तसेच क्रीडा, सांस्कृतिक, एनसीसी, एनएसएस आणि स्नेहसंमेलन निमित्ताने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्टुडंट ऑफ द इयर पारितोषिक देखील वितरित करण्यात आले. यावेळी बोलताना प्रा. प्रशांत मोरे म्हणाले, आई-वडील यांचा सन्मान कायमच केला पाहिजे. आईचा प्रत्येक शब्द आपण फुलासारखा मानला पाहिजे. दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे विद्यार्थी गुणी आहेत. शिक्षणासोबतच संस्कार इथे दिले जातात हे पाहून आनंद झाला. यावेळी त्यांनी आपल्या कविताच्या माध्यमातून विविध विषयांना स्पर्श केला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर म्हणाले, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी सर्वच क्षेत्रात पुढे आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकिता बिराजदार आणि विद्या सूर्यवंशी यांनी तर शेवटी आभार डॉ. विशाल वर्मा यांनी मानले.

# महाराष्ट्र व गोवा वकील परिषदच्या निवडणुकीत लातूर येथे ७१% मतदान

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर दिनांक २४ मार्च २०२६ रोजी महाराष्ट्र व गोवा वकील परिषदेच्या निवडणुकीसाठी राज्यभरातून २ लाख ६० हजार विधीज्ञ मतदारानी मतदानाचा हक्क बजावणार होते.

अत्यंत प्रतिष्ठेची व चुरशीची असलेली निवडणूक राज्यभर प्रथमच महिलाना प्रतिनिधी देणारी असल्याने राज्यभरातून १८ पुरुष तर ५ महिला असे एकूण २३ विधिज्ञ सदस्याची निवड केली जाते त्यात महिला आरक्षित गटातून जवळपास ५३ महिला निवडणूक लढवत असल्याने राज्यातून जवळपास १५५ पुरुष व महिला विधीज्ञानी या निवडणुकीत उमेदवारी भरून सहभाग नोंदवला आहे.

या निवडणुकीत पसंती क्रमांकानुसार १ ते २३ मतदान नोंदवले जाते. महाराष्ट्र व गोवा वकील परिषदेसाठी नोंदणीकृत लातूर जिल्हा वकील मंडळाच्या १९०० नोंदणीकृत विधिज्ञा पैकी १३४९ विधिज्ञानी उन्हाची तीव्रता असताना ही मतदानाचा हक्क सकाळी ९ ते सायंकाळी ६.३० पर्यंत




बजावला आहे या प्रतिष्ठेच्या निवडणूकीत लातूर जिल्हयातून महाराष्ट्र व गोवा वकील परिषदेचे माजी उपाध्यक्ष अँड बळवंतराव जाधव, माजी सदस्य अँड अण्णाराव पाटील, अँड जांबुवंतराव सोनकवडे, अँड जयश्री संभाजी पाटील, अँड नयना देवताळकर , अँड सुहास चाटे अहमदपूर, लातूरचे सुपुत्र व छत्रपती संभाजी नगर येथे कार्यरत असलेले अँड बलभीम केदार यांनी सदस्य पदासाठी निवडणूक लढवली आहे मतदान मोजणी प्रक्रिया जवळपास ३ ते ४ महिने पार पाडली जाते त्यानंतर सदस्य निवड जाहीर करून त्यातून अध्यक्ष, उपाध्यक्ष व दोन मानद सदस्य निवड केली जाते. प्रमुख जिल्हा न्यायाधीश एस जी भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंधक व्हि के राऊत, जे पी वाघ, विष्णु कुलकर्णी, एस आर देशमुख, मुजबीर शेख आदीनी लातूर जिल्हा न्यायालयात वकील मंडळात पार पडलेली मतदान प्रक्रिया यशस्वी पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले आहेत तसेच यावेळी मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# क्षयरोग मुक्त; भारत देश करुया

भारत सरकारने सन २०२५ पर्यत क्षयमुक्त भारत देश करण्यासाठी सर्वच क्षेत्रामध्ये महत्वाची पावले उचलली आहे. याकरीता आपणांस प्रत्येक क्षयरुग्णांपर्यत पोहोचलो तरच आपण क्षयरोग मुक्त भारत देश करु शकतो. जालना जिल्ह्यातील २०२५ या वर्षातील क्षयरोगाबाबतची स्थिती खालीलप्रमाणे आहे. वर्ष २०२५ मध्ये एकुण शोधण्यात आलेले क्षयरुग्ण २३३५, बरे झालेले क्षयरुग्ण ११२६, उपचारावर असणारे क्षयरुग्ण ११५४ या वर्षीचे आपले उदिदृष्ट १०० टक्के पुर्ण करण्यासाठी आपल्या सर्वाचे प्रयत्न आवश्यक आहे. या प्रमुख उदेद्शानेच क्षयरोगाबाबतची माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

**क्षयरोगाचे भारतातील प्रमाण :-** प्रत्येक दोन मिनिटाला एक रुग्ण क्षयरोगाने मरण पावतो. एक थुंकी दुषित रुग्ण वर्षभरात १० ते १५ लोकांना क्षयरोगाचा प्रसार करतो. यामुळे क्षयरुग्ण संख्येत वाढ होत आहे. यामुळे या क्षयरोगास गांर्भीयाणे घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण उद्याचा भारत देश क्षयरोग मुक्त असला पाहिजे. क्षयरोग म्हणजे कायघ् य. क्षयरोग हा मायकोबॅक्टेरियम टयुबरक्युलोसिस नावांच्या जंतुमुळे होतो. या जंतुचा शोध डॉ.रॉबर्ट कॉक या शास्त्रज्ञाने २४ मार्च-१८८२ रोजी लावला हे जंतु मुख्यत: फुफ्फूसांवर परिणाम करतात. त्यामुळे फुफ्फूसाचा क्षयरोग होतो. परंतु काही रुग्णांमध्ये शरीराच्या इतर भागावरही उदा. हाडे, मज्जातंतु, सांधे, लिम्फनोड, इत्यादी या जंतुचा परिणाम होतो.

**क्षयरोग कसा पसरतो :-** मायकोबॅक्टेरियम टयुबरक्युलोसिस हे क्षयरोगाचे जंतु हवेतुन पसरतात (ड्रॉपलेट इन्फेक्शन). फुफ्फुसाचा क्षयरोग असलेला रुग्ण जेंव्हा खोकतो किंवा शिंकतो तेंव्हा क्षयरोगाचे हे जंतु हवेत पसरतात व ज्यावेळी निरोगी मनुष्य श्वास घेतो तेंव्हा हे जंतु त्याच्या शरीरात श्वसनमार्गे प्रवेश करतात व ज्यावेळी त्या व्यक्तीची प्रतिकारशक्ती कमी होते, त्यावेळी क्षयरोगाचे लक्षणे दिसुन येतात.

क्षयरोगाचे लक्षणे :-

**अ) सर्वसाधारण व्यक्ती :-** २ आठवड्यापेक्षा जास्तीचा खोकला, संध्याकाळी ताप येणे, वजनात घट, भुक मंदावणे , छातीत दुखणे, खोकल्यातून किंवा थुंकीतून रक्त पडणे.

**ब) अति जोखमीच्या व्यक्ती :-** थुंकी दुषित रुग्णांच्या संपर्कातील व्यक्ती, मधुमेही, एच.आय.व्ही.बाधीत रुग्ण, कुपोषित व्यक्ती, प्रतिकार शक्ती कमी असलेले, धुम्रपान करणाऱ्या व्यक्ती, स्टेरॉईड औषध घेणाऱ्या व्यक्ती, मुत्रपिंडाचे आजार असणाऱ्या व्यक्ती, फुफ्फुसाचे इतर आजार असणाऱ्या व्यक्ती (दमा) यांना एक दिवसाचा जरी खोकला असला तरी ती क्षयरोगाची संशयीत व्यक्ती आहे म्हणुन त्यांनी क्षयरोगाची तपासणी करावी.

**फुफुसाव्यतिरिक्त क्षयरोग :-** मानेवर सुज व गाठी, मज्जातंतू, हाडे, सांधे, पाठीचे मणके इ. शरीराच्या अवयवांना क्षयरोग होतो, याला पुपुसाव्यतीरीक्त क्षयरोग म्हणतात. क्षयरोगाचे निदान :-फुफ्फुसाच्याक्षयरोगाचे निदान हे थुंकी (बेडका) तपासणीद्वारे व छातीचा क्ष-किरण तपासणी करुन केले जाते.यामध्ये संशयीत क्षयरुग्णांची दोन बेडका नमुने तपासणीसाठी घेतले जातात. सुक्ष्मदर्शकाखाली दोन्ही थुंकी नमुन्यावर प्रक्रिया करुन तपासणी केली जाते.संबधीत रुग्णाची बेडका तपासणी व छातीचा क्ष-किरण तपासणी केल्यानंतरसदरील रुग्ण पॉझिटीव्ह असल्यास वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत डॉट्स औषधोपचार सुरु करण्यात येतात. तसेच सिबीनॅट तपासणीही करतात. वरील सर्व तपासण्या शासकीय रुग्णालयात मोफत केल्या जातात.


**औषधोपचार :-** राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत डॉटस् औषधोपचार प्रणालीचा वापर केला जातो. या औषधोपचार प्रणालीमध्ये क्षयरुग्णांना वजनाप्रमाणे औषधोपचार हे या औषधोपचार पध्दतीचे मुख्य वैशिष्टये आहे. वजन गट रुग्णांचे प्रकार अतिदक्षता काळात दिला जाणारा औषधोपचार पध्दत नियमित काळात दिला जाणारा औषधोपचार क्षयरुग्णांना शासनामार्फत मोफत देण्यात येतो. डॉटस् औषधोपचार पध्दतीमुळे जिल्हयातील जास्तीत जास्त क्षयरुग्ण बरे होत आहेत व ही क्षयरोगावरील प्रभावी औषधोपचार पध्दती ठरत आहे. डि.आर.टिबी :- जालना जिल्ह्यात दिनांक १४ फेब्रुवारी २०११ पासून डि.आर.टिबी औषधोपचार प्रणाली सुरु करण्यात आली आहे. क्षयरुग्णांनी डि.एस.टिबी औषधोपचार प्रणालीप्रमाणे व्यवस्थित औषधी न घेतल्यास, कोणताही फॉलोअप स्पुटम पॉझिटिव्ह, डिफॉल्टर, फेल्युअर, रिलॅप्स केस, एचआयव्ही बाधीत अशा केसच्या संशयित क्षयरुग्णांना डि.आर.टिबी संशयीत क्षयरुग्ण म्हणतात. डॉट प्लस साइट येथे रुग्णाच्या विविध शारीरीक व रक्ताची तपासणी केली जाते. तसेच रुग्णांना पीएमडीटी अंतर्गत औषधे व्यवस्थितरीत्या रुग्णाच्या शरीरास लागू होतात किंवा नाही याची खात्री केल्या जाते. डॉट प्लस साईटने ठरवून दिलेल्या नुसारच औषधोपचार ६ ते २० महिने दिल्या जातो. तसेच नविन औषधी बिडाक्युलीन व डेलामॅनीड हे औषधी क्षयरोगावर अत्यंत प्रभावी ठरत असुन हे रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. तसेचशासन सदर औषधी क्षयरुग्णास मोफत पुरवठा करते. सिबीनॅट ट्रनॅट प्रयोगशाळा :- ०१ मे २०१६ पासुन जालना जिल्ह्यात मोफत सिबीनॅट व ट्रनॅट तपासणीची सुविधा पुरविण्यात येत आहे. सद्यस्थितीमध्ये जालना जिल्हयात सिबीनॅट व ट्रनॅटद्वारे तपासणी सुविधा खालील १८ ठिकाणी उपलब्ध आहेत. जालना जिल्हयातील सिबीनॅट मशिन साईट उपजिल्हा रुग्णालय अंबड, सामान्य रुग्णालय, जालना, जिल्हा क्षयरोग केंद्र, जालना, ग्रामिण रुग्णालय घनसावंगी, ग्रामिण रुग्णालय परतुर, तर जालना जिल्ह्यातील ट्रनॅट मशिन साईट ग्रामिण रुग्णालय बदनापुर, ग्रामिण रुग्णालय मंठा, ग्रामिण रुग्णालय जाफ्राबाद, सामान्य रुग्णालय जालना, ग्रामिण रुग्णालय राजुर, ग्रामिण रुग्णालय टेंभुर्णी, वैद्यकीय महाविद्यालय वरुडी ता.बदनापुर, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय अंबड, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय बदनापुर, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय भोकरदन, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय घनसावंगी, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय परतुर, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय मंठा या प्रयोगशाळेत सर्व नवीन क्षयरुग्ण कोणताही फॉलोअपस् स्पुटम पॉझिटीव्ह, डिफॉल्टर, फेल्युअर, रिलॅप्स केस, लहान बालके, ईपी केसेस, एचआयव्ही बाधीतक्षयरुग्णांची मोफत केली जाते. क्षयरुग्णांचे निदान तो कोणता क्षयरोग आहेघ् औषधास दाद देणारा किंवा औषधाला दाद न देणारा म्हणजेच डि.आर. टिबी आहे, हे पाहण्यासाठी रुग्णांची प्रयोगशाळेत तपासणी केली जाते. या प्रयोगशाळेत सर्व शासन यंत्रणेत क्षयरोगाचा औषधोपचार घेणारे क्षयरुग्ण व खाजगी रुग्णालयात क्षयरोगाचा उपचार घेणारे क्षयरुग्ण यांची मोफत तपासणी केली जाते. सदर तपासणी खाजगी प्रयोगशाळेत केली असता त्यासाठी साधारण ३ ते ४ हजार रुपये खर्च येतो, ही सेवा शासनामार्फत सर्व क्षयरुग्णांना उपरोक्त ठिकाणी मोफत देण्यात येत आहे. निक्षय पोषण आहार योजना :-०१ एप्रिल-२०१८ पासुन भारत सरकारने क्षयरुग्णांसाठी निक्षय पोषण आहार योजनेची सुरवात केली आहे. या योजनेअंतर्गत शासकीय यंत्रणेकडे क्षयरोगाचा उपचार घेणारा क्षयरुग्ण किंवा खाजगी रुग्णालयात औषधोपचार घेणारा क्षयरुग्ण संपुर्ण क्षयरोग उपचार पुर्ण होईपर्यत प्रती महिना १०००- रु.असे मानधन सकस पोषण आहार घेण्याकरीता क्षयरुग्णांच्या बँक खात्यामध्ये डीबीटीद्वारे जमा करण्यात येते. वर्ष २०२५ मध्ये जालना जिल्हयामध्ये शासकीय व खाजगी यंत्रणेकडे क्षयरोगाचा उपचार घेणाऱ्या २३६४ क्षयरुग्णांना ५३,८६,०००- रु. इतके अनुदान जिल्हा क्षयरोग केंद जालना मार्फत क्षयरुग्णांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यात आले आहेत.

**टिबीमुक्त भारत अभियान :-**भारत सरकारने दिनांक ०९ सप्टेंबर-२०२२ पासुन 'टिबीमुक्त भारत अभियान' ची सुरुवात करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत उपचारावर असणाऱ्या क्षयरुग्णांना तसेच रुग्णांच्या गरजेनुसार मदत ही जिल्हयातील सिएसआर अंतर्गत येणाऱ्या औद्योगीक संस्था, सिड्स कंपन्या, दानशुर व्यक्ती इत्यादींना 'निक्षय मित्र' बनवुन 'कम्युनिटी सपोर्ट टु टिबी पेशंटस' या योजनेअंतर्गत क्षयरुग्णांना मदत पुरविली जात आहे. माहे वर्ष-२०२२ ते आजपर्यंत उपचारावर असणाऱ्या क्षयरुग्णांना १९०४६ कोरड्या पोषण आहार किटचे वाटप जालना जिल्हयातील विविध एनजीओ, जालना स्टील मेन्युफैक्चरिंग असोसिएशन, सामाजिक संस्था, दानशुर व्यक्ती इत्यादींनी क्षयरुग्णांना मदत केलेली आहे.

**प्रतिबंधात्मक उपाय योजना :-** इंग्रजीमध्ये एक म्हण आहे कोणत्याही आजाराला बरे करण्यापेक्षा त्याला प्रतिबंध करणे केंव्हाही चांगले. त्यासाठी खालील उपाययोजना आहेत. १.नवजात बालकांचे १०० टक्के बी.सी.जी.चे लसीकरण झाले पाहिजे. २.आपला आहार संतुलीत सकस प्रथीनेयुक्त असावा. ३.व्यसनांपासून दुर राहणे (धुम्रपान, दारु, तंबाखु) ४.थुंकी दुषित क्षयरुग्णांनी तोंडाला रुमाल किंवा एन-९५ मास्क बांधणे. ५. संशयीत क्षयरुग्णाला शोधुन लवकर रोग निदान व औषधोपचार करणे. ६.स र्व फुफ्फुसाच्या क्षयरुग्णांच्या संपर्कातील व्यक्तींना वजनानुसार गोळ्या ०६ महिने घेणे आवश्यक आहे. ७.नातेवाईक, मित्र-मंडळी व घरातील इतर व्यक्तींनी सदर रुग्ण नियमित औषधोपचार घेतो की नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कारण एक थुंकीदुषित क्षयरुग्ण १० ते १५ लोकांना क्षयरोगाची बाधा करतो. ८.मधुमेह व इतर आजारांचे नियमित उपचार घेणे. २४ मार्च जागतिक क्षयरोग दिन २०२६ चे घोषवाक्य खालीलप्रमाणे आहे. '' होय ! आपण क्षयरोगाचा अंत करू शकतो : नेतृत्व जालना जिल्हा, समर्थीत जनभागीदारी''

**- डॉ. जी. एम. कुडलीकर**

# कपडे विरहित झोपणे .....



हे त्वचेची जळजळ आणि संक्रमणाचे एक प्रमुख कारण आहे. जेव्हा आपण नग्न झोपता तेव्हा आपल्या त्वचेतील हवेचा प्रवाह मोठ्या प्रमाणात सुधारला जाऊ शकतो आणि अस्वस्थता आणि संक्रमण नियंत्रित केले जाऊ शकते. प्रायव्हेट पार्ट्सचे आरोग्य सुधारण्यासाठीही फायदेशीर ठरेल.

लैंगिक संभोगास प्रोत्साहित करते

जोडीदारांसाठी, पलंग सामायिक करताना अडथळे न येणे मानसिक आणि शारीरिक जवळीक आणखी मजबूत करू शकते. ऑक्सिटोसिन, ज्याला प्रेम संप्रेरक म्हणून देखील ओळखले जाते जेव्हा जोडीदाराची त्वचा एकमेकांच्या संपर्कात येते, ऑक्सिटोसिन सोडते, जे लैंगिक संभोग आणि शारीरिक आणि भावनिक जिव्हाळ्यास प्रोत्साहित करते.

वजन नियंत्रित करण्यास मदत करते

नग्न झोपून तुम्ही वजन कमी करू शकता, असं सांगितलं तर तुमचा विश्वास बसेल का? झोपताना शरीराला थंड करण्यासाठी तपकिरी चरबी सक्रिय होते. हा चरबीचा एक प्रकार आहे जो शरीराचे तापमान राखण्याचे काम करतो. तपकिरी चरबी सक्रिय झाल्यामुळे चयापचय गती आणि कॅलरीचे प्रमाण वाढते. यामुळे तुमचे वजन कमी होण्यास मदत ह ोईल.

**आत्मविश्वास वाढवते**

स्वत:च्या त्वचेला स्पर्श केल्याने मिळणाऱ्या आत्मतृप्तीमुळे आत्मविश्वास वाढू शकतो. स्वतःच्या स्वरूपाबद्दल आणि शारीरिक तंदुरुस्तीबद्दल जागरूक होणे संपूर्ण कल्याणासाठी फायदेशीर ठरू शकते.

नग्न झोपणे नवीन नाही: अभ्यास

थंड तापमानात नग्न झोपणे प्राचीन मानवाच्या उत्क्रांतीच्या इतिहासात स्पष्ट झाले आहे. बायोसायन्स २०२३ मध्ये प्रकाशित झालेल्या या अभ्यासात थंडीत नग्न राहण्याबाबतही चर्चा करण्यात आली आहे. दक्षिण आफ्रिकेतील बुशमन, ऑस्ट्रेलियातील अबोर्गिन्स, तिएरा डेल फुएगोमधील यामाना आणि अलेक्टोफ या संस्कृतींमधील लोक शेकडो वर्षांपासून नग्न झोपले आहेत. हे कसे शक्य आहे हे शोधण्याचा प्रयत्न या अभ्यासात केला जात आहे. अग्नी पेटवून आणि त्यातून गरम होऊन ते थंडीपासून बचावले. थंड हवामानात त्यांनी मोठी चुली बांधून त्याजवळ झोपून रात्री वारंवार वाऱ्यामुळे आग विझवू नये म्हणून इंधन घालून उपाय शोधला.

**महत्त्वाचे मुद्दे**

नग्न झोपल्यास झोपेची गुणवत्ता सुधारणे, शरीराचे तापमान नियंत्रित राहते आणि वजन नियंत्रित राहते यासारखे नग्न झोपण्याचे काही दुर्लक्षित फायदे तज्ञ सांगतात.भारतात हे सामान्य नसले तरी ब्रिटनमधील एका सर्वेक्षणात असे आढळले आहे की देशातील एक पंचमांश लोक नग्न झोपणे पसंत करतात. वृद्ध लोक नियमितपणे या पद्धतीचे अनुसरण करतात, विशेषत: त्याच्या फायद्यांमुळे

# युद्ध लवकर थांबणे हेच जगाच्या हिताचे !



**प्रा. डॉ. मोहन कांबळे**

इराण-इस्रायल संघर्ष आणि अमेरिका-भारत व्यापार करारातील स्थगिती या दोन्ही घडामोडींनी जागतिक तसेच भारतीय अर्थव्यवस्थेवर तीव्र परिणाम घडवले आहेत. त्यातून वाढती महागाई, व्यापारातील अनिश्चितता आणि आर्थिक तणाव स्पष्टपणे समोर येत आहेत. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत होत असून कच्च्या तेलाच्या किमती वाढत आहेत. त्यामुळे भारतासारख्या देशांमध्ये इंधनदर आणि जीवनावश्यक वस्तू महाग होत आहेत. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोरोनासदृश्य परिस्थितीला तयार राहण्याचे आवाहन केले आहे.

अमेरिका-इस्रायल-इराण संघर्षाने अलीकडील काळात अत्यंत गंभीर आणि धोकादायक वळण घेतले असून या संघर्षातील ताज्या घडामोडींनी केवळ मध्यपूर्वेतील राजकीय संतुलन ढवळून काढले नाही तर जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा सुरक्षाव्यवस्था आणि भारतासारख्या विकसनशील देशांवरही व्यापक व दूरगामी परिणाम घडवून आणले आहेत. इस्रायलने केलेल्या अचूक आणि लक्ष्यभेदी लष्करी कारवार्यांमध्ये इराणच्या तीन महत्त्वाच्या अधिकार्यांचा मृत्यू झाल्याचे इराणने अधिकृतपणे मान्य केल्याने परिस्थिती अधिकच तणावपूर्ण बनली आहे. या मृतांमध्ये अली लारोजानो आणि रेजा सुलेमानी यांसारख्या प्रभावी व्यक्तींचा समावेश असल्याचे समजते. ज्यामुळे इराणच्या राजकीय आणि लष्करी नेतृत्वाला मोठा धक्का बसला आहे. या घटनेच्या प्रत्युत्तरादाखल इराणने इस्रायलवर बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांनी हल्ले चढवून आपली आक्रमक भूमिका स्पष्ट केली आहे. इराणचा दावा आहे की त्यांनी इस्रायलची अत्याधुनिक 'आयर्न डोम' संरक्षण प्रणाली भेदण्यात यश मिळवले आणि तेल अवीवसारख्या महत्त्वाच्या शहरांतील इमारतीवर अचूक निशाणा साधला. या दाव्यामुळे इस्रायलच्या अभेद्य मानल्या जाणार्या संरक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या हल्ल्यांमुळे शहरी पायाभूत सुविधांवरही गंभीर परिणाम झाल्याचे चित्र दिसून येत आहे. दरम्यान, इराणने आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेला कळविले आहे की, त्यांच्या वीज निर्मिती करणार्या अणूप्रकल्पांपैकी एका प्रकल्पाला नुकसान झाले आहे. ही बाब अत्यंत चिंताजनक मानली जात असून अणूप्रकल्पांवरील कोणतीही हानी केवळ स्थानिक पातळीवर मर्यादित राहत नाही तर ती प्रादेशिक तसेच जागतिक पर्यावरणीय संकटाचे कारण ठरू शकते. त्यामुळे या संघर्षाचे स्वरूप पारंपरिक युद्धापासून संभाव्य अणुजोखमीकडे झुकत असल्याचे संकेत मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर अमेरिकेची भूमिकादेखील महत्त्वाची ठरत आहे. विशेषत: राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी क्यूबा देश ताब्यात घेण्याबाबत व्यक्त केलेले विधान हे जागतिक स्तरावर नव्या वादाला तोंड फोडणारे ठरले आहे. अशा प्रकारची आक्रमक भाषा केवळ मध्यपूर्वेतील तणाव वाढवण्यापुरती मर्यादित राहत नाही तर लॅटिन अमेरिकेतील राजकीय स्थैर्यावरही परिणाम करू शकते. याचवेळी इस्रायल आणि अमेरिकेने असा दावा केला आहे की, त्यांनी इराणविरुद्धचे युद्ध जवळपास जिंकले असून इराणची बॅलेस्टिक क्षेपणास्त्र क्षमता मोठ्या प्रमाणावर निष्प्रभ करण्यात यश मिळवले आहे. या दाव्यांमुळे युद्धबंदीची शक्यता वर्तवली जात असली तरी प्रत्यक्षात परिस्थिती अद्याप अस्थिरच आहे. इराणकडून होणार्या संभाव्य प्रत्युत्तरात्मक कारवायांची तीव्रता लक्षात घेता हा संघर्ष थांबण्याऐवजी अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या जागतिक संघर्षाचा थेट परिणाम भारतावर, विशेषत: महाराष्ट्रासारख्या राज्यांवर, कर्ज आणि महागाईच्या स्वरूपात जाणवत आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीत सुमारे ३ लाख टन एलपीजी घेऊन येणारी भारताची ६ जहाजे युद्धजन्य परिस्थितीमुळे अडकून पडली आहेत. ही सामुद्रधुनी जागतिक तेल आणि वायू वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाची असल्यामुळे येथे निर्माण झालेला अडथळा भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी गंभीर आव्हान ठरत आहे. याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रात एलपीजी सिलेंडरच्या किमतीत सुमारे ६० रुपयांनी वाढ झाली आहे, तर गहू आणि डाळीसारख्या अत्यावश्यक वस्तूंच्या किमतीत किलोमागे २ ते ३ रुपयांची वाढ नोंदवली गेली आहे. ही वाढ सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर थेट परिणाम करणारी असून विशेषत: मध्यमवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी अधिकच त्रासदायक ठरत आहे. या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने एलपीजी उत्पादन ९००० मेट्रिक टनांवरून ११,००० मेट्रिक टनांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय तात्पुरता दिलासा देणारा असला तरी दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षिततेसाठी अधिक व्यापक आणि शाश्वत धोरणांची गरज अधोरेखित करतो. याचदरम्यान 'नंदादेवी' ही भारताची दुसरी एलपीजी वाहक नौका सुरक्षितपणे गुजरातच्या किनार्यावर पोहोचल्याने काही प्रमाणात दिलासा मिळाला असला तरी एकूण पुरवठा साखळीतील अनिश्चितता कायम आहे.

या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर जागतिक बाजारपेठेत अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ, पुरवठा साखळीतील अडथळे आणि गुंतवणूकदारांचा कमी झालेला आत्मविश्वास यामुळे शेअर बाजारात मोठ्या प्रमाणावर घसरण झाली आहे. जागतिक स्तरावरील प्रभावी उद्योगपती आणि आर्थिक शक्तिकेंद्रे युद्ध थांबवण्यासाठी किती प्रमाणात राजकीय दबाव आणतात, यावर भविष्यातील अनेक घडामोडी अवलंबून राहतील. एकंदरीत पाहता, इराण इस्रायल संघर्ष हा केवळ दोन राष्ट्रांमधील लष्करी संघर्ष राहिलेला नसून तो एक व्यापक जागतिक संकट म्हणून उभा राहत आहे. ऊर्जा सुरक्षेपासून अन्नधान्याच्या किमतीपर्यंत, शेअर बाजारापासून आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंत विविध स्तरांवर त्याचे परिणाम जाणवत आहेत. त्यामुळे या संघर्षाचे तातडीने आणि शांततामय मार्गाने निराकरण होणे हे केवळ संबंधित देशाची गरज नसून संपूर्ण जगासाठी अत्यावश्यक बनले आहे. अमेरिका-भारत व्यापार कराराला मिळालेली स्थगिती केवळ राजनैतिक किंवा न्यायालयीन प्रक्रियेतील अडथळा नसून तिचे परिणाम अत्यंत व्यापक आणि बहुआयामी स्वरूपाचे असल्याचे सध्याच्या आर्थिक आणि व्यापारी परिस्थितीवरून स्पष्टपणे जाणवते. या स्थगितीमुळे महागाई, निर्यात, शेती, उद्योग, ऊर्जा सुरक्षा आणि जागतिक व्यापार व्यवस्थेतील स्थैर्य यावर एकाच वेळी परिणाम होत असल्याचे चित्र दिसून येते, आणि या सर्व घटकांचा परस्पर संबंध लक्षात घेतल्यास जागतिक अर्थव्यवस्थेतील अनिश्चिततेची पातळी किती वाढली आहे, हे प्रकर्षाने समोर येते, प्रस्तावित करारानुसार भारत आणि अमेरिका यांच्यातील अतिरिक्त २५ टक्के आयात शुल्क हटवण्याची आणि परस्पर आयात शुल्क सुमारे १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्याची रूपरेषा निश्चित करण्यात आली होती. या निर्णयामुळे द्विपक्षीय व्यापार अधिक सुलभ होईल, उद्योगांना स्थिरता मिळेल आणि ग्राहकांना तु-लनेने कमी किमतीत वस्तू उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र, अमेरिकन न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे हा करार अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडल्याने संपूर्ण टॅरिफ संरचनेत गोंधळ निर्माण झाला आहे.विशेषत: कापड, दागिने आणि अभियांत्रिकी वस्तू यांसारख्या निर्यातप्रधान क्षेत्रांना या अनिश्चिततेचा सर्वाधिक फटका बसत आहे. अमेरिकन बाजारपेठ ही या क्षेत्रांसाठी अत्यंत महत्त्वाची असल्यामुळे आयात शुल्कातील कोणतीही अनिश्चितता थेट उत्पादन खर्च, पुरवठा साखळी नियोजन आणि नफा यावर परिणाम करते. परिणामी उद्योगांना स्पर्धात्मक दर राखणे कठीण होत असून त्याचा परिणाम अखेरीस महागाईच्या स्वरूपात ग्राहकांवर होतो. वस्त्रोद्योगाच्या बाबतीत ही समस्या अधिक तीव्र आहे, कारण भारताला बांगलादेश आणि व्हिएतनामसारख्या देशांशी थेट स्पर्धा करावी लागत आहे. जर अमेरिकेच्या नव्या कररचनेत भार-तावर तुलनेने जास्त शुल्क लादले गेले, तर भारतीय कापड अमेरिकन बाजारात महाग ठरेल आणि निर्यात घटण्याची शक्यता निर्माण होईल. विश-ेषत: जेव्हा स्पर्धक देशांना सुमारे १७ टक्के शुल्काचा लाभ मिळत असेल आणि भारताला १८ टक्के किंवा त्याहून अधिक शुल्क भरावे लागत असेल, तेव्हा किंमत स्पर्धेत टिकून राहणे कठीण होते. यामुळे उत्पादन घटण्याची, रोजगारावर परिणाम होण्याची आणि देशांतर्गत बाजारात किमती वाढण्याची शक्यता वाढते. याचप्रमाणे हिरे आणि दागिने उद्योगालाही या अनिश्चिततेचा मोठा फटका बसत आहे.इराण-इस्रायल संघर्ष आणि अमेरिका-भारत व्यापार करारातील स्थगिती या दोन्ही घडामोडींनी जागतिक तसेच भारतीय अर्थव्यवस्थेवर तीव्र परिणाम घडवले असून त्यातून वाढती महागाई, व्यापारातील अनिश्चितता आणि आर्थिक तणाव स्पष्टपणे समोर येत आहेत. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत होत असून कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने भारतासारख्या देशांमध्ये इंधनदर आणि जीवनावश्यक वस्तू महाग होत आहेत, तर त्याचवेळी अमेरिका भारत व्यापार करार लांबल्याने निर्यात क्षेत्रात अस्थिरता निर्माण झाली आहे, ज्यामुळे उद्योगांना स्पर्धात्मकता टिकवणे कठीण जात आहे. कापड, दागिने आणि अभियांत्रिकी क्षेत्रांवर विशेष दबाव निर्माण झाला असून याचा परिणाम उत्पादन, रोजगार आणि बाजारभावांवर होत आहे. दुसरीकडे काही क्षेत्रांना तात्पुरते संरक्षण मिळत असले तरी एकूणच जागतिक आर्थिक व्यवस्थेत अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. परिणामी महागाई वाढ, गुंतवणूकदारांचा कमी झालेला आत्मविश्वास आणि पुरवठा साखळीतील अडथळे यामुळे आर्थिक तणाव अधिक गडद होत आहे. परिस्थिती स्थिर होण्यासाठी शांतता, स्पष्ट धोरणे आणि समन्वित जागतिक प्रयत्नांची गरज अधिक अधोरेखित होत आहे.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




**(क्रमश: कालच्या अंकातून)** ज्यामध्ये व्यक्तीचे वागणे आणि त्याचा मूड सतत बदलतो. कधी त्याला फार उत्साह वाटतो तर कधी त्याला फार जास्त डिप्रेशन येतं. जास्त डिप्रेशन आल्यास काम करण्याचा उत्साह आणि आनंदसुद्धा अशावेळी नकोसा वाटतो.

## २ Joke — विनोद




एक माणूस भिकाऱ्याला दटावतो, अरे एवढा धडधाकट आहेस. भीक काय मागतोस. कष्ट कर. साहेब, मोठ्या कष्टाने चोरी केली तर तुरुंगाची हवा खायला लागली.

## ३ Message — संदेश



Teacher- Bataao bachcho jo galat kaam karte hain wo kaha jate hain??
Student- sharmate huye bola sir..
Manuabhaan tekri, EKAANT park, Chinar park, MAYUR park...

## ४ Thought — सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.- डॉन प्याट


**संस्कृत सुभाषित**

**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रियः॥**

**मराठीत अर्थ**

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. पटकन, चटकन
४. प्राणी
७. विसराळू
१०. मायेची सावली
१२. पातळ खांब
१५. कपाळ
१७. आईचा भाऊ
१९. मज्जाव
२०. फुरसत
२१. एक श्वासरोग
२२. नवरा
२३. भाकरीचे एक धान्य
२४. उद्याच्या नंतरचा दिवस
२६. माहेरी आलेली स्त्री
२८. पूर्ण भरतीची वेळ
२९. दिवटी
३२. महासर्प
३५. पाणी
३६. चलनवलन
३९. तमाशा
४०. थेट
४१. केशरी गराचे व हिरव्या सालीचे फळ
४३. संरक्षणाचे आवरण
४४. दात
४५. पहारेकरी
४८. स्वत:ला
४९. गोंजारणे, समजूत काढणे
५०. अखंड
५१. मैत्रीण
५२. तोंड
५३. पुन्हा पुन्हा
५७. जिवलग
६०. चेष्टा, टिंगलटवाळी
६१. सीतेचे वडील
६३. एक चतुर्थांश
६५. माफी मागणारा
६७. छोट्यांची गाणी
७०. चांदीचा बिल्ला
७३. चिंचेची चव
७४. तात्पुरते रुसणे
७५. कोर्टातील कथन
७६. सोन्याची फुले उधळून घेण्याचे हक्कदार
७७. सबब, निमित्त

### उभे शब्द

१. टप्प्या टप्प्यानी केलेला प्रवास
२. अलमारी
३. निर्जीव तरी वाढणारे
५. चौक
६. पाठविलेला
८. मध्यम प्रमाण
९. आकांत करणे
११. रमापती
१३. शिर्डीचे संत
१४. कट्टर
१६. तिबेटी धर्मगुरु
१८. संगीतातील एक राग
१९. मृत्यू
२५. लक्ष्मी
२६. सामान
२७. थंड
३१. रेशमी वीण असलेल्या पदराची साडी
३२. फावला वेळ
३३. विश्व
३४. अखबार
३६. जादू
३७. रेशमाची गुंडाळी
३८. गडीमाणसे
४१. आपले नसलेले
४२. प्रश्न
४३. विद्या
४६. अफूचे बी
४७. निकट, जवळ
४८. मनातील इमले
५१. हेतूपूर्वक
५३. तपासणी करणारा, पारखी
५४. मुलगी
५५. धोबी
५६. शरीर
५८. वैयक्तिक
५९. मेहेरबानी
६२. खाण्यासाठी भाजलेले मांसाचे गोळे
६४. राबता, जाणे येणे
६६. पाऊले
६८. खोटी तात्पुरती भावना
६९. युवक
७०. चांदी
७१. अर्धी ओंजळ
७२. सावध
७३. आम्रफल

### आडवे उत्तर

१.मटकन ४.जनावर ७.विसरभोळा १०.पाखर १२.वासा १५.ललाट १७.मामा १९.मनाई २०.सवड २१.दमा २२.वर २३.बाजरी २४.परवा २६.माहेरवाशीण २८.समा २९.मशाल ३२.अजगर ३५ जल ३६.हालचाल ३९.वग ४०.तडक ४१.पपनस ४३.कवच ४४.रद ४५.रखवालदार ४८.मला ४९.चुचकारणे ५०.सलग ५१.सखी ५२.मुख ५३.परत परत ५७.सखा ६०.थट्टामस्करी ६१.जनक ६३.पाव ६५.क्षमायाचक ६७.बालगीत ७०.रौप्यपदक ७३.आंबट ७४.रुसवा ७५.साक्ष ७६.पणजोबा ७७.कारण

### उभे उत्तर

१.मजल दर मजल २.कपाट ३.नख ५.नाका ६.रवाना ८.सरासरी ९.भोकाड पसरणे ११.रमावर १३.साईबाबा १४.कडवा १६.लामा १८.मारवा १९.मरण २५.रमा २६.माल २७.शीतल ३१.टोपपदर ३२.अवसार ३३.जग ३४.समाचारपत्र ३६.हा-तचलाखी ३७.लड ३८.चाकरचुकर ४१.परका ४२.सवाल ४३.कला ४६.खसखस ४७.लगत ४८.मनोरथ ५१.सकाम ५३.परीक्षक ५४.तनया ५५.रजक ५६.तन ५८.खाजगी ५९.कृपा ६२.कबाब ६४.वहिवाट ६६.चरण ६८.लटका ६९.तरुण ७०.रौप्य ७१.पसा ७२.दक्ष ७३.आंबा



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### बीसीसीआय कडून नव्या ७ नियमांची घोषणा, पालन न केल्यास होणार कारवाई

मुंबई–इंडियन प्रीमियर लीगच्या १९ व्या सीजनचं बिगुल वाजलं असून २८ मार्च पासून सुरु होणाऱ्या खझङ २०२६ साठी बीसीसीआयने नव्या ७ नियमांची घोषणा केलेली आहे. १९ व्या सीजन दरम्यान आयपीएलच्या सर्व १० संघांना हे नियम पाळावे लागतील. तेव्हा हे ७ नियम नेमके काय आहेत. याचा परिणाम स्पर्धेवर कशाप्रकारे होणार याबाबत जाणून घेऊयात. बीसीसीआयने आयपीएल २०२६ पूर्वी सराव आणि ट्रेनिंग सेशन संदर्भात काही नियम काढले आहेत. कोणत्याही आयपीएल संघाला सामन्याच्या दिवशी ट्रेनिंग करण्याची परवानगी दिली जाणार नाही. आयपीएल २०२६ साठी बीसीसीआयने नियम हा संघाच्या सराव सामान्यांशी निगडित केलेला आहे. कोणत्याही संघाला दोनपेक्षा जास्त सराव सामने खेळण्याची परवानगी नाहीये. सराव सामना खेळण्यापूर्वी त्यांना बीसीसीआयची परवानगी घ्यावी लागले तसेच त्यांना हे सुद्धा लक्षात ठेवावे लागेल की कोणताही सामना हा ३ तासांपेक्षा जास्त वेळ चालणार नाही. बीसीसीआयचा नवा नियम हा संघाच्या नेट प्रॅक्टिस सेशनशी जोडलेला आहे. कोणताही संघ प्रॅक्टिस नेट्स शेअर करणार नाही.

### दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार पटेल आयपीएलच्या 'इम्पॅक्ट प्लेयर' नियमावर नाराज

**मुंबई**–आयपीएल २०२६ साठी दिल्ली कॅपिटल्स संघात मिचेल स्टार्कच्या सहभागाबाबत अनिश्चितता कायम आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने अद्याप त्याला ना हरकत प्रमाणपत्र दिलेले नाही. फ्रँचायझीला आशा आहे की १ एप्रिल रोजी लखनऊ सुपर जायंट्सविरुद्धच्या सलामीच्या सामन्यापूर्वी तो संघात सहभागी होईल.मुख्य प्रशिक्षक हेमांग बदानी यांनी सांगितले की, ते क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या सतत संपर्कात आहेत. त्यांनी स्पष्ट केले की, स्टार्क अलीकडे गोलंदाजी करत आहे, पण जोपर्यंत क्रिकेट ऑस्ट्रेलिया त्याला पूर्णपणे तंदुरुस्त घोषित करत नाही, तोपर्यंत फ्रँचायझी काहीही करू शकत नाही. क्रिकेट संचालक वेणुगोपाल राव यांनीही स्पष्ट केले की, स्टार्कचे आगमन केवळ ना हरकत प्रमाणपत्राला (ऱ्ध्ण) झालेल्या विलंबामुळेच होत आहे. जर स्टार्क वेळेवर उपलब्ध झाला नाही, तर संघाच्या रचनेनुसार निर्णय घेतला जाईल, असे अक्षर पटेल म्हणाला. त्याने असेही सांगितले की, टी नटराजन पूर्णपणे तंदुरुस्त असून चांगली कामगिरी करत आहे.

### यश दयालला आरसीबी ने टीममधून बाहेर काढले?

दिल्ली–भारतीय क्रिकेटर आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा गोलंदाज यश दयाल याच्यावर काही महिन्यांपूर्वी लैंगिक छळाचे आरोप लागले होते. गाझियाबाद आणि जयपूर येथील दोन महिलांनी त्याच्यावर लैंगिक छळाचे आरोप लावले. सध्या हे दोन्ही खटले न्याय प्रविष्ठ आहेत. यश दयालवर लैंगिक छळाचे आरोप होऊन सुद्धा आयपीएल २०२६ साठी आरसीबीने त्याला ऑक्शनपूर्वी संघात रिटेन केलं होतं. त्यावरून अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. लैंगिक छळाचे आरोप असणाऱ्या खेळाडूला आरसीबी आयपीएलमध्ये (घ्झ्थ) आपल्या संघाकडून कशी खेळवू शकते अशी चर्चा सुद्धा फॅन्समध्ये रंगली होती. मात्र मीडिया रिपोर्ट्समधून हाती येत असलेल्या माहितीनुसार क्रिकेटर यश दयाल याला आयपीएल २०२६ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसाठी खेळण्याची संधी मिळणार नाही. आरसीबीचे क्रिकेट डायरेक्टर मो बोबाटने या संदर्भात पुष्टी केली आहे.क्रिकेबझशी खास बातचीत करताना आरसीबीचे क्रिकेट डायरेक्टर मो बोबाटने सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या अनेक शक्यतांवर मौन सोडून म्हटलं की यश दयाल त्याच्या काही वैयक्तिक समस्यांशी झुंज देत असून या कारणांमुळे तो या सीजनमध्ये

## वेगवान गोलंदाज यश दयाल आयपीएल २०२६ मधून बाहेर

### आरसीबीला मोठा धक्का

नवी दिल्ली : आयपीएल २०२६ च्या आधी रॉयल चॅलेंजर्स बंगळूरला मोठा धक्का बसला आहे. वेगवान गोलंदाज यश दयाल वैयक्तिक कारणांमुळे या स्पर्धेत सहभागी होणार नाही. त्याच्या अनुपस्थितीमुळे अनेक अफवा पसरल्या आहेत. विशेषतः त्याच्यावरील गंभीर आरोपांच्या अलीकडील वादामुळे. आरसीबीच्या संघ संचालकांनी दयालच्या स्पर्धेतून माघार घेतल्याची पुष्टी केली, पण तो संघासोबत करारबद्ध असल्याचेही सांगितले.यश दयालची सराव सत्रांमधील अनुपस्थिती आणि संघाच्या बसवरील पोस्टरवर त्याचे नाव न दिसल्यामुळे त्याच्या आयपीएलमधील सहभागाबद्दलच्या अफवांना आधीच जोर आला होता. तो गोलंदाज कुठे आहे, असा प्रश्न अनेकांना पडला होता. विशेष म्हणजे, दयाल अलीकडे अनेक मोठ्या वादांमध्ये अडकला आहे. काही महिन्यांपूर्वी, एका अल्पवयीन मुली–वर झालेल्या कथित बलात्काराच्या प्रकरणात अडकलेला असताना त्याचा अटकपूर्व जामीन नाकारण्यात आला होता.

आरसीबीच्या संघ संचालकांनी आयपीएल २०२६ हंगामातील त्याच्या अनुपस्थितीची पुष्टी केली. त्यांनी सांगितले की, दयाल सध्या एका वैयक्तिक संकटातून जात आहे आणि त्यामुळे तो आगामी हंगामात संघाकडून खेळू शकणार नाही.

गतविजेते म्हणून, रॉयल चॅलेंजर्स बंगळूर आयपीएल २०२६ च्या नवीन हंगामाची सुरुवात करणार आहे. रजत पाटीदारच्या नेतृत्वाखालील हा संघ, स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात इशान किशनच्या नेतृत्वाखालील सनरायझर्स हैदराबादचा सामना करेल. हे दोन्ही संघ २८ मार्च रोजी बंगळूरमधील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर एकमेकांसमोर उभे ठाकतील. दोन्ही संघ पुन्हा एकदा हे प्रतिष्ठित विजेतेपद जिंकण्याच्या उद्देशाने हंगामाची चांगली सुरुवात करण्याची आशा बाळगून असतील. आयपीएल २०२५ मध्ये आरसीबी चॅम्पियन बनली होती, तर सनरायझर्स हैदराबाद गेल्या हंगामात सहाव्या स्थानावर राहिली आणि नॉकआऊट फेरीसाठी पात्र ठरू शकली नाही.



## मुख्यमंत्र्यांकडून आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके जिंकण्याचा संकल्प करण्याचे आवाहन



पुणे: राज्यातील विद्यार्थ्यांना लहान वयापासूनच क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात 'क्रीडा स्पेशालिस्ट शाळा' सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याची माहिती शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली. स्वर्गीय अजित पवार क्रीडा नगरी, वाघोली (पुणे) येथे आयोजित ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चित्रफितीद्वारे स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. त्यांनी स्पर्धेतील मोठ्या सहभागाचे कौतुक करत महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या पारितोषिक रकमेत ४० लाखांवरून १ कोटी रुपयांपर्यंत वाढ करण्यात आल्याचे नमूद केले.

राज्यातील कुस्तीपटूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके जिंकण्याचा संकल्प करावा, असे आ–वाहन त्यांनी केले.

स्पर्धेच्या अंतिम लढतीत नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर यांनी दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले आणि ६८ वा महाराष्ट्र केसरी किताब आपल्या नावे केला. त्यांना शिक्षण मंत्री दादाजी भुसे व कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते चांदीची गदा, रोख ५ लाख रुपये आणि फॉर्च्युनर चारचाकी गाडीची चावी प्रदान करण्यात आली.

या स्पर्धेत सोलापूरच्या महेंद्र गायकवाड यांनी उपविजेतेपद पटकावले. त्यांना रोख ४ लाख रुपये तसेच स्कॉर्पिओ गाडीची चावी देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाला आमदार बापूसाहेब पठारे, ज्ञानेश्वर कटके, राष्ट्रीय कुस्तीगीर महासंघाचे अध्यक्ष संजयकुमार, महाराष्ट्र कुस्तीगीर महासंघाचे अध्यक्ष रामदास तडस, संयोजक रामकृष्ण सातव पाटील यांच्यासह कुस्ती संघटनांचे पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले, राज्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच क्रीडा क्षेत्रात संधी मिळावी, यासाठी प्रत्येक जिल्ह्यात क्रीडा स्पेशालिस्ट शाळा सुरू करण्यात येणार असल्याची त्यांनी माहिती दिली.

यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी कुस्ती क्षेत्रासाठी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या योगदानाची आठवण करून दिली. भविष्यात कुस्तीपटूंना भेडसावणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाकडून सर्वतोपरी मदत करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## मियामी ओपनमधून अल्काराझ बाहेर

**मियामी :** कार्लोस अल्काराझ याचा मियामी ओपनमधील प्रवास तिसर्या फेरीतच संपला. अमेरिकेच्या सेबेस्टियन कोर्डा याने त्याला ६–३, ५–७, ६–४ अशा अटीतटीच्या लढतीत पराभूत केले. हा सामना २ तास १९ मिनिटे चालला. सध्याचा ऑस्ट्रेलियन ओपन विजेता अल्काराझ या सामन्यात आपल्या लयीत दिसला नाही. सामन्यादरम्यान तो खूप निराश दिसला आणि एका क्षणी त्याने आपल्या टीमकडे म्हणत नाराजी व्यक्त केली की, आता आणखी सहन होत नाही, मी घरी जातोय. त्याच्या या प्रतिक्रियेमुळे चाहत्यांना आश्चर्य वाटले. दुसर्या सेटमध्ये अल्काराझने पुनरागमनाचा प्रयत्न केला, पण निर्णायक सेटमध्ये कोर्डाने संयम राखत विजय मिळवला. एटीपी रँकिंगमध्ये ३६व्या स्थानावर असलेल्या कोर्डाने महत्त्वाच्या क्षणी उत्कृष्ट खेळ करत हा मोठा उलटफेर घडवून आणला.या पराभवासह मियामी ओपनमध्ये अल्काराझचा संघर्ष कायम राहिला आहे.



## बांगलादेशात आयपीएल बंदीचा पुनर्विचार



### पीएसएलसाठी सुरक्षा अहवालानंतर निर्णय

ढाका : बांगलादेशमध्ये इंडियन प्रिमियर लीग (आयपीएल) च्या प्रसारणावर लावलेल्या बंदीचा लवकरच पुनर्विचार होण्याची शक्यता आहे. क्रीडा राज्यमंत्री अमीनुल हक यांनी सांगितले की, बंदी का घालण्यात आली याची चौकशी करून परिस्थिती समजून घेतल्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल. त्यांनी खेळ आणि राजकारण वेगळे ठेवण्यावर भर दिला असून भारतासोबत मैत्रीपूर्ण संबंध कायम ठेवण्याची भूमिका स्पष्ट केली आहे.

दरम्यान, पाकिस्तान सुपर लीग (पीएसएल) मध्ये बांगलादेशी खेळाडूंना पाठवण्याबाबतचा निर्णय सुरक्षा अहवाल–ावर अवलंबून असेल. बांगलादेश क्रिकेट बोर्ड (बीसीबी) कडून सरकारला सविस्तर माहिती दिल्यानंतरच अंतिम निर्णय घेतला जाईल. जर कोणताही धोका आढळला, तर खेळाडूंना पाकिस्तानात पाठवले जाणार नाही.सध्याच्या परिस्थितीत पीएसएल २०२६ चे सामने लाहोर आणि कराची येथे प्रेक्षकांविना खेळवले जाणार आहेत. त्यामुळे सुरक्षा हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा ठरला आहे. एकूणच, बांगलादेश सरकार खेळ सुरू ठेवण्याच्या बाजूने असले तरी सुरक्षा आणि परिस्थितीचा सखोल आढावा घेतल्यानंतरच पुढील पावले उचलणार आहे.

## खेळाडूंनी मॅटवरील कुस्तीला प्राधान्य द्यावे



### महाराष्ट्र केसरी विजेता हर्षवर्धन सदगीर याचे मत

पुणे : ऑलिम्पिकमध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंना खेळायचे असल्यास मॅटवरील कुस्तीलाच प्राधान्य द्यायला हवे, असे मत महाराष्ट्र केसरी विजेता हर्षवर्धन सदगीर याने व्यक्त केले. यापुढे हिंद केसरी आणि राष्ट्रकुल स्पर्धांमध्ये पदक मिळवणे हे ध्येय असल्याचे त्याने सांगितले.पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने ६८ व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेतील डबल महाराष्ट्र केसरी विजेता हर्षवर्धन सदगीर याचा वार्तालाप आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रशिक्षक अर्जुन पुरस्कार प्राप्त काका पवार, संघाचे सरचिटणीस मंगेश फल्ले, खजिनदार दिलीप तायडे उपस्थित होते.

सदगीर म्हणाला, जेथे अजूनही पाणी व पुरेशी वीज नाही अशा गावातून माझ्या कुस्ती करीअरची सुरूवात केली. आजोबांच्या प्रे–रणेतून कुस्तीची गोडी लागली. आधी नाशिक व नंतर पुण्यात काका पवार यांच्या तालमीत प्रशिक्षण घेतले. २०२० ला प्रथमच महाराष्ट्र केसरी स्पर्धा जिंकली; परंतू पुन्हा एकदा मैदानात उतरायचे स्वप्न होते. त्या ध्येयाने मेहनत करत राहिलो आणि पुन्हा एकदा यशस्वी झालो. याचे श्रेय आई–वडील, गुरू यांना देतो, असे त्याने सांगितले.

आता लक्ष्य आंतरराष्ट्रीय स्पर्धांवर

पुढील वाटचालीत स्वतःची एक छोटी व्यायामशाळा सुरू करण्याचे स्वप्न आहे. आता संपूर्ण लक्ष्य आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या तयारीवर केंद्रित करणार आहे. नवीन मल्लांनी मेहनतीमध्ये सातत्य ठेवावे. मेहनत केल्यास कोणत्याही खेळात यश हमखास मिळते. यावेळी त्याने लहानपणापासूनचा आतापर्यंतचा कुस्ती खेळातील प्रवास, आलेल्या अडचणी व भविष्यातील ध्येय यावर प्रकाश टाकला.

सरकारने संधी दिल्यास नोकरी स्वीकारेन

पहिल्यांदा केसरी स्पर्धेत विजेता झाल्यावर सरकारदरबारी खेट्या मारूनही नाशिक महानगरपालिकेत क्रीडा अधिकारी म्हणून नियुक्तीची अपेक्षा पूर्ण झाली नाही. आता झालेल्या स्पर्धेवेळी भावनेच्या भरात मी कुस्ती सोडणार व नोकरी करणार नाही असे म्हणालो होतो. पण आता सरकारने संधी दिल्यास मी नक्कीच नोकरी स्वीकारेन, असे हर्षवर्धन याने यावेळी सांगितले.

राजकारणामुळे खेळाडूंचे नुकसान : काका पवार

कुस्तीत राजकारण घुसल्यामुळे तसेच संघटनांमधील वादामुळे खेळाडूंचे नुकसान होत आहे. मात्र, खेळाडूंनी हे वाद बाजूला ठेवून ऑलिम्पिकचे स्वप्न पाहावे. दरम्यान महाराष्ट्रानेही या खेळाला प्रोत्साहन द्यायला हवे. हरियाना राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र मागे पडत असून, मातीसोबतच आता मॅटवर पकड मजबूत करणे काळाची गरज आहे. राज्यात सध्या तीन उपअधीक्षक कुस्तीपटू आहेत, सरकारने त्यांना सोबत घेऊन नवीन खेळाडू घडवण्यासाठी ठोस धोरणं बनवली पाहिजेत', अशी अपेक्षा सदगीरचे प्रशिक्षक काका पवार यांनी यावेळी केली.

## हॉकी इंडियाची ८ व्या वार्षिक पुरस्कार २०२५ साठी नामांकने जाहीर

**नवी दिल्ली :** हॉकी इंडियाने ८ व्या वार्षिक पुरस्कार २०२५ साठी नामांकनांची यादी जाहीर केली. २७ मार्च २०२६ रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या या पुरस्कार सोहळ्यात, २०२५ या वर्षात भारतीय हॉकीसाठी उत्कृष्ट कामगिरी आणि योगदान देणाऱ्या हॉकूपटू आणि अधिकाऱ्यांचा सन्मान केला जाणार आहे.

या सोहळ्यातील प्रमुख पुरस्कारांमध्ये 'हॉकी इंडिया बलबीर सिंग सीनियर प्लेयर ऑफ द इयर' पुरस्काराचा समावेश आहे. जो पुरुष आणि महिला गटातील सर्वो त्कृष्ट हॉकपटूंना दिला जाणार आहे. तसेच, उदयोन्मुख प्रतिभावंतांना 'हॉकी इंडिया जुगराज सिंग इमर्जिंग प्लेयर ऑफ द इयर (पुरुष अंडर–२१)' आणि 'हॉकी इंडिया असुंता लाक्रा इमर्जिंग प्लेयर ऑफ द इयर (महिला अंडर–२१)' या पुरस्कारांनी सन्मानित केले जाणार आहे.

विविध स्थानांवरील उत्कृष्ट कामगिरीसाठी 'हॉकी इंडिया बलजीत सिंग गोलकीपर ऑफ द इयर', 'हॉकी इंडिया परगत सिंग बेस्ट डिफेंडर ऑफ द इयर', 'हॉकी इंडिया अजित पाल सिंग बेस्ट मिडफिल्डर ऑफ द इयर' आणि 'हॉकी इंडिया धनराज पिल्लई बेस्ट फॉरवर्ड ऑफ द इयर' हे पुरस्कारही प्रदान केले जातील. या आठ श्रेणींमध्ये एकूण ३२ हॉकीपटूंची निवड करण्यात आली आहे.

याव्यतिरिक्त, 'हॉकी इंडिया प्रेसिडेंट्स आउटस्टँडिंग अचिव्हमेंट अवॉर्ड', 'जमन लाल शर्मा इनव्हॅल्युएबल कॉन्ट्रिब्युशन अवॉर्ड', पंच आणि तांत्रिक अधिकाऱ्यांसाठी विशेष सन्मान आणि 'बेस्ट मेंबर युनिट अवॉर्ड' हे पुरस्कारही या सोहळ्यात प्रदान केले जातील.

राजगीर (बिहार) येथे २०२५ च्या आशिया कपमध्ये सुवर्णपदक जिंकलेल्या भारतीय पुरुष संघाला आणि तामिळनाडू येथे झालेल्या एफआयएच हॉकी मेन्स ज्युनियर वर्ल्ड कपमध्ये कांस्यपदक जिंकलेल्या भारतीय ज्युनियर पुरुष संघालाही सन्मानित केले जाणार आहे. १५ व्या हॉकी इंडिया राष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सदस्य संघांनाही सन्मानित केले जाईल.



हॉकी इंडियाचे अध्यक्ष डॉ. दिलीप तिर्की म्हणाले, भारतीय हॉकीसाठी हे वर्ष महत्त्व–पूर्ण आहे आणि मागील वर्षातील उत्कृष्ट कामगिरीला मान्यता देणे महत्त्वाचे आहे. हे पुरस्कार हॉकपटू आणि अधिकाऱ्यांच्या समर्पणाचा आणि कामगिरीचा सन्मान करतात.

महासचिव भोला नाथ सिंग म्हणाले, हे पुरस्कार खेळाडू, प्रशिक्षक, अधिकारी आणि सदस्य संघांच्या सामूहिक प्रयत्नांना मान्यता देतात, ज्यांनी भारतीय हॉकीला मजबूत करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजा–वली आहे.

नामांकन मिळाले हॉकपटू खालीलप्रमाणे:

वर्षातील सर्वोत्कृष्ट गोलकीपर (बलजीत सिंग पुरस्कार): प्रिन्स दीप सिंग, कृष्ण बहादूर पाठक, बिचू देवी खरिबाम, सूरज करकेरावर्षातील सर्वोत्कृष्ट बचावपटू (परगत सिंग पुरस्कार): संजय, अमित रोहिदास, जुगराज सिंग, हरमनप्रीत सिंग.

वर्षातील सर्वोत्कृष्ट मिडफिल्डर (अजित पाल सिंग पुरस्कार): हार्दिक सिंग, सुमित, राजकुमार पाल, नीलकांत शर्मा.

वर्षातील सर्वोत्कृष्ट फॉरवर्ड (धनराज पिल्लई पुरस्कार): सुखजीत सिंग, अभिषेक, नवनीत कौर, शिलानंद लाक्रा.

वर्षातील उदयोन्मुख हॉकीपटू (२१ वर्षाखालील महिला, असुंता लाक्रा पुरस्कार): साक्षी राणा, ज्योती सिंग, सुनीलिता टोप्पो, कनिका सिवाच

वर्षातील उदयोन्मुख हॉकीपटू (पुरुष अंडर–२१ , जुगराज सिंग पुरस्कार): प्रिन्स दीप सिंग, मनमीत सिंग, अनमोल एक्का, अर्शदीप सिंग.

वर्षातील सर्वोत्तम महिला हॉकपटू (बलबीर सिंग वरिष्ठ पुरस्कार): नवनीत कौर, सलीमा टेटे, लालरेमसियामी, सविता.

वर्षातील सर्वोत्तम पुरुष हॉकीपटू (बलबीर सिंग वरिष्ठ पुरस्कार): हार्दिक सिंग,

# जागतिक क्षयरोग दिन उत्साहात साजरा; १०० दिवसीय विशेष शोध मोहिमेचा सुरुवात

**लातूर/प्रतिनिधी :**जागतिक क्षयरोग दिनाचे औचित्य साधून लातूर जिल्हा क्षयरोग केंद्राच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे विशेष जनजागृती कार्यक्रम आणि रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. 'क्षयमुक्ती'चा निर्धार करत या कार्यक्रमाद्वारे जिल्ह्यात १०० दिवसीय विशेष क्षयरोग शोध मोहिमेला सुरुवात झाली.

कार्यक्रमाची सुरुवात महान शास्त्रज्ञ डॉ. रॉबर्ट कॉक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. जिल्हा क्षयरोग अधिकारी श्रीमती डॉ. एस.एन. तांबारे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी आपल्या भाषणात क्षयरोगाचे निर्मूलन करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग किती महत्त्वाचा आहे, यावर प्रकाश टाकला.






जनजागृती रॅली आणि पथनाट्य

मान्यवरांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. ही रॅली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कपासून महात्मा गांधी चौकापर्यंत काढण्यात आली व पुन्हा त्याच ठिकाणी समारोप झाला. य्वेळी बाभळगाव येथील नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी क्षयरोग विषयावर प्रभावी पथनाट्य सादर करून नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बाभळगाव नर्सिंग कॉलेज, न्यू व्हिजन, महाराष्ट्र नर्सिंग कॉलेज, जीवन रेखा, वेदांत आणि सोनी नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने रॅलीत सहभाग नोंदवला.

**१०० दिवसीय शोध मोहीम आणि आरोग्य शिबिरे**

जागतिक क्षयरोग दिनाचे औचित्य साधून २४ मार्च २०२६ पासून जिल्हाभरात १०० दिवसीय क्षयरोग शोध मोहीम राबवण्यात येणार आहे. या अंतर्गत अतिजोखीम असलेल्या गावांमध्ये 'आयुष्यमान आरोग्य शिबिरांचे' आयोजन करून रुग्णांची तपासणी व उपचार केले जाणार आहेत.

या कार्यक्रमास इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे अध्यक्ष डॉ. मन्मथ भातंबरे, आयएमए अध्यक्ष डॉ. अभय कदम, कुष्ठरोग सहाय्यक संचालक डॉ. वैशाली तांभाळे, जिल्हा नेत्रचिकित्सक डॉ. श्रीधर पाठक, डॉ. अभिजीत यादव, रेड क्रॉस सोसायटीचे पदाधिकारी विनोद कुचेरिया, राजेश पाटील, श्रीकांत करवा आणि मनपा वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वाती मजगे, डॉ. योगेश गवसाने तसेच डॉ. हर्षवर्धन राऊत उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती किरण चोथे यांनी केले, तर डॉ. हर्षवर्धन राऊत यांनी उपस्थितांचे आभार मानले. जिल्हा क्षयरोग केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# कठोर परिश्रमासोबत आत्मविश्वास असेल तरच यश निश्चित मिळते : पोलीस उपनिरीक्षक श्री. गणेश चित्ते

**लातूर/प्रतिनिधी :**भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर यांच्या वतीने संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबीर' या उपक्रमाचा उद्घाटन समारंभ दि. २३ मार्च २०२६ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्रा. गोविंदराव घार हे होते, तर उद्घाटक म्हणून डॉ. कुसुम मोरे यांनी उपस्थित राहून शिबिराचे उद्घाटन केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपनिरीक्षक श्री. गणेश चित्ते, संस्थेचे सदस्य मा. श्री. पवन घार, प्राचार्य प्रो. डॉ. श्रीधर कोल्हे, राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार सदस्य डॉ. संगीता घार, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले व डॉ. प्रमोद चव्हाण उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

प्रा. गोविंदराव घार म्हणाले की, "आजच्या युवकांमध्ये नेतृत्वगुण विकसित होणे ही काळाची गरज आहे. अशा शिबिरांमधून विद्यार्थ्यांना जबाबदारीची जाणीव, संघटन कौशल्य आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होते."

डॉ. कुसुम मोरे यांनी सांगितले की, "राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. नेतृत्व विकास शिबिरांमुळे युवकांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि समाजसेवेची प्रेरणा मिळते."

पोलीस उपनिरीक्षक श्री. गणेश चित्ते म्हणाले की, "परिश्रम आणि आत्मविश्वास यांच्या बळावरच खरे यश प्राप्त होते. युवकांनी सातत्याने मेहनत घेत आत्मविश्वास टिकवून ठेवला तर कोणतेही ध्येय गाठणे अशक्य नाही. तसेच शिस्त, प्रामाणिकपणा आणि सामाजिक जबाबदारी अंगीकारल्यास ते सक्षम व आदर्श नागरिक बनू शकतात."

यावेळी प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांनी मत व्यक्त केले की, "राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नेतृत्व, संघटन आणि समाजकार्याची प्रत्यक्ष अनुभूती मिळते. हे शिबीर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयुक्त ठरेल."

कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. प्रमोद चव्हाण यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. केशव आलगुले यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. अरुण साळुंके यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. रमेशअप्पा कराड यांनी सुचना देताच तडे गेलेल्या रेणापूरच्या महामार्ग सिमेंट रस्त्यावर दुरुस्तीचे काम सुरू

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ते रेणापूर या राष्ट्रीय महामार्गावर नेहरूनगर परिसरात सिमेंट काँक्रीट रस्त्यावर जागोजागी भेगा पडल्या, तडे गेले यामुळे अपघात होण्याची शक्यता गृहीत धरून वाहन चालकांना कसरत करत प्रवास करावा लागत असे. रस्त्याची दुरावस्था लक्षात घेऊन भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देताच सदरील रस्त्यावर महामार्ग विभागाच्या वतीने तातडीने दुरुस्तीचे काम सुरू झाले आहे. दुरुस्तीचे काम सुरू झाल्याने




वाहनधारकातून समाधान व्यक्त केले जात आहे.

लातूर औरंगाबाद या रस्त्याचे केंद्रीय रस्ते महामार्ग विभागामार्फत मागील काळात सिमेंट काँक्रीट रस्ता तयार करण्यात आला. या रस्त्यामुळे प्रवासाची मोठी सोय झाली. मात्र गेल्या काही दिवसापासून सदरील महामार्ग रस्त्यावरील लातूर ते रेणापूर दरम्यानच्या सिमेंट काँक्रीट रस्त्यावर नेहरूनगर परिसरात जागोजागी अनेक ठिकाणी मोठ्या भेगा पडल्या रस्त्याला तडे गेल्याने विविध वाहनधारकासह दुचाकी वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रात्री अपरात्री तर तारेवरची कसरत करत जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत असे. महामार्गावरील सदर भेगा पडलेल्या ठिकाणी वाहन धारकाचे अपघात झाले आहेत.

महामार्गावर नेहरूनगर परिसरात सिमेंट काँक्रीट रस्त्यावर पडलेल्या भेगा आणि तडे यामुळे नागरिकांचे होणारे हाल लक्षात घेऊन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना सदरील रस्त्याची परिस्थिती निदर्शनास आणून दिली व तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या. आ. कराड यांच्या सूचनाची तात्काळ दखल घेऊन राष्ट्रीय महामार्ग लातूर विभागाच्या वतीने सोमवारी नेहरूनगर परिसरातील महामार्ग रस्त्यावर दुरुस्तीचे काम युद्ध पातळीवर सुरू झाले आहे. सदरील डागडुजीचे व दुरुस्तीचे काम सुरू झाल्याने वाहनधारकासह नागरिकांतून समाधान व्यक्त केले जात आहे.

## भारतीय सशस्त्र सैन्यदलात अधिकारी पदासाठी नवयुवक व नवयुवतींना मोफत प्रशिक्षणाची संधी

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलातील अधिकारी पदांच्या भरतीसाठी सीडीएस परीक्षेची तयारी करण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे सीडीएस कोर्स क्रमांक ६५ आयोजित करण्यात येत आहे. या कोर्ससाठी लातूर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी २८ एप्रिल २०२६ रोजी लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद प्रकाश पांढरे (निवृत्त) यांनी केले आहे.

या कोर्सचे आयोजन ४ मे २०२६ ते १३ मे २०२६ या कालावधीत नाशिक रोड येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रात होणार आहे. निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींना ३ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता केंद्रावर हजर राहावे लागणार आहे. कोर्सदरम्यान प्रशिक्षणार्थींना मोफत प्रशिक्षण, निवास आणि भोजनाची सुविधा पुरविण्यात येणार आहे.

उमेदवारांनी मुलाखतीस येताना सैनिक कल्याण पुणे यांच्या संकेतस्थळावरून किंवा जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून सीडीएस-६५ कोर्सचे प्रवेशपत्र व संबंधित परिशिष्टांची प्रिंट भरून सोबत आणावी. उमेदवारांनी कंम्बाईंड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन (सीडीएस-युपीएससी) किंवा नॅशनल डिफेन्स अकॅडमी एक्झामिनेशन (एनडीए-युपीएससी) उत्तीर्ण केलेले असावे व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड (एसएसबी) मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. तसेच एनसीसी स्पेशल एंट्री, टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्स, युनिव्हर्सिटी एंट्री स्कीम (यूईएस) साठी एसएसबी कॉल लेटर असणे किंवा एसएसबी शिफारस यादीत नाव असणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड यांच्याशी ईमेल (training. pctcnashikgmail. com), दूरध्वनी (०२५३-२४५१०३२) किंवा व्हॉट्सॲप (९१५६०७३३०६) या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद प्रकाश पांढरे (निवृत्त) यांनी कळविले आहे.

# महावितरणकडून वीजबिल वसुली मोहिम अधिक आक्रमक

## २४९७ वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत; सहा दिवसात साडेदहा कोटी वसुलीचे आव्हान

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील लघूदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वीजग्राहकांसह इतर वर्गवारीतील वीज ग्राहकांकडे थकीत ३६ कोटी ३० लाख व चालू महिन्याचे ५८ कोटी १६ लाख अशा एकत्रीत ९४ कोटी ४६ लाख रुपयांच्या वीजबिल वसुलीसाठी महावितरणने वसुली मोहीम मार्च अखेरीस अधिक आक्रमक केली आहे. थकबाकीदार वीजग्राहक रडारवर असून वारंवार सुचना देवूनही दाद न देणाऱ्या ग्राहकांचा वीजपुरवठा थेट मीटर काढून खंडित करण्याची कारवाई करण्यात येत आहे. वीज खंडित केल्यानंतर कुणी परस्पर जोडल्यास महावितरणतर्फे थेट पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे. ग्राहकांनी चालू बिलासह थकबाकी भरून सहकार्य करावे आणि वीजपुरवठा खंडीत करण्याची कटू कारवाई टाळावी असे आवाहन महावितरणने केले आहे.

जिल्ह्यात घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील वीज ग्राहकांकडे आज रोजी ९४ कोटी ४६ लाख रुपयांची वीजबिल थकबाकी आहे. वसुलीसाठी संपूर्ण जिल्ह्यात महावितरणचे सर्व अभियंते, अधिकारी, कर्मचारी भर उन्हात दारोदार फीरत आहेत. अनेक ग्राहक तातडीने बिल भरून सहकार्य करत आहेत. मात्र जे ग्राहक बिल भरण्यास प्रतिसाद देत नाहीत, त्यांचा वीजपुरवठा नाईलाजास्तव खंडित करण्यात येत आहे. काल पर्यंत २ हजार ४९७ वीजपुरवठा तात्पुरत्या स्वरूपात खंडीत करण्यात आला आहे. त्याचबरोबर स्मार्ट मीटर असलेल्या ग्राहकांचा वीजपुरवठा ऑटो डिस्कनेक्ट होत आहे. नॉन स्मार्ट मीटर असेल, तर ते थेट काढून आणले जात आहे. थकबाकी भरल्यावरच नवीन स्मार्ट मीटरने वीजपुरवठा जोडण्यात येत आहे. गेल्या चोवीस दिवसात लातूर मंडळातील थकबाकीदार ग्राहकांनी ४७ कोटी ७३ लाख रूपयांच्या बिलांचा भरणा केला आहे. हे प्रमाण चालू बिलाच्या केवळ ८२ टक्केच असून मागील थकबाकीला स्पर्शही झालेला नाही. यामधे निलंगा विभागाची मागील थकबाकी ४ कोटी ८५ लाख असून चालू महिन्याचे ९ कोटी ४८ लाख वसुल करावयाचे आहेत. यापैकी केवळ ८ कोटी २७ लाख वसूल झाले आहेत. तर उदगीर विभागातील ग्राहकांकडे १७ कोटी २३ लाख थकबाकी असून चालू महिन्याचे १५ कोटी ९० लाख वसूल करण्याचे आव्हान आहे. काल पर्यंत यापैकी केवळ १३ कोटी २८ लाख वसूल करण्यात यश मिळाले आहे. त्याचबरोबर लातूर विभागातील ग्राहकांकडे १४ कोटी २१ लाख थकबाकी असून चालू महिन्याचे ३२ कोटी ७८ लाख वसूल करण्याचे आव्हान आहे. काल पर्यंत यापैकी केवळ २६ कोटी १८ लाख वसूल करण्यात आले आहेत. वीजबील वसुलीसाठी विभागीय कर्मचाऱ्यांसोबतच लातूर परिमंडल कार्यालयाचे वरिष्ठ अधिकारीही थकबाकीदारांचे दार ठोठावत आहेत. सुट्टीच्या दिवशीही ही मोहीम सुरू आहे. जिल्ह्यातील सर्व ग्राहकांनी थकबाकी व चालू वीजबिले भरून सहकार्य करावे व संभाव्य गैरसोय टाळावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

मुख्य अभियंत्यांनी घेतला आढावा

महावितरणच्या लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले हे सातत्याने वसुलीवर लक्ष ठेवून आहेत. जास्त थकबाकी असलेल्या व वसुली कमी असलेल्या उपविभागाला प्रत्यक्ष भेट देऊन वसुलीचा आढावा घेत आहेत. यावेळी अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी हे सुध्दा वारंवार बैठका घेवून व प्रत्यक्ष उपविभागीय क्षेत्रात वसुलीसाठी फीरत आहेत. निलंगा विभागाचे कार्यकारी अभियंता नागेश देशमूख, उदगीर विभागाचे कार्यकारी अभियंता रविंद्र महाव्दार तसेच लातूर विभागाचे कार्यकारी अभियंता अनिरूध्द घाटगे यांच्यासह तांत्रिक कर्मचारी, लेखा विभाग व मानव संसाधन विभागाचे अधिकारी कर्मचारी वसुलीसाठी फीरत



आहेत. मार्च अखेरीस केवळ सहा दिवस राहिल्याने युद्धपातळीवर वसुलीचे काम करा, अशा सूचना मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी दिल्या आहेत.

वीजबील भरण्यासाठी विविध पर्याय उपलब्ध असून सर्व वीजग्राहकांनी तातडीने थकीत वीजबिल भरणे गरजेचे आहे. अन्यथा महावितरणला वीजपुरवठा खंडित करण्याशिवाय कोणताही पर्याय नाही. सर्वांनी थकीत वीजबिल भरून महावितरणला सहकार्य करावे-अरविंद बुलबुले, मुख्य अभियंता लातूर परिमंडल

# डॉ. भाग्यश्री घाळे यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

**लातूर (मोईज सितारी):-** पुणे येथील स्वप्निल फाउंडेशन तर्फे महिला दिनाचे औचित्य साधून समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तबगार महिलांचा सन्मान करण्यात आला. हा भव्य कार्यक्रम ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सांस्कृतिक सभागृह येथे पार पडला. या कार्यक्रमात उदगीर येथील डॉ. भाग्यश्री घाळे यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. त्यांच्या सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. डॉ.भाग्यश्री घाळे गेली अनेक वर्षे वैद्यकीय सेवा देत असून, त्याचबरोबर त्या सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातही सक्रिय सहभाग घेत आहेत.



डॉक्टर म्हणून कार्य करत असताना त्यांनी शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. 'वॉइसेस ऑफ वुमन इन उदगीर' या वृत्तचित्रात त्यांनी उदगीर येथील लॉयन्स नेत्र रुग्णालयाचे कार्य व ओसवाल सेंटरबाबत प्रभावी माहिती सादर केली होती.

याशिवाय, महाराष्ट्रातील मराठीत लिहिलेले पहिले 'सीपीआर' गीत त्यांनी लेखनबद्ध केले असून त्यात अभिनयही केला आहे. तसेच 'गुड टच बॅड टच' या संकल्पनेद्वारे लहान मुलांमध्ये जनजागृती करण्यासाठी त्यांनी गीताच्या माध्यमातून उत्कृष्ट कार्य केले आहे. या दोन्ही गीतांना प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला आहे.

स्वप्निल फाउंडेशनतर्फे मिळालेल्या या सन्मानाबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला असून, या पुरस्कारामुळे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच वैद्यकीय क्षेत्रात अधिक जोमाने कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

हे कार्य करत असताना त्यांना सतत प्रेरणा देण्याचे कार्य त्यांचे वडील, ब्राईट स्टार हायस्कूलचे संचालक डॉ. वीरभद्र घाळे व आई प्रेमलता घाळे यांनी केले असून, त्यांच्या प्रोत्साहन व आशीर्वादामुळेच हे यश शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी डॉ. भाग्यश्री घाळे यांनी स्वप्निल फाउंडेशन पुणे तसेच सर्व पत्रकार बांधवांचे आभार मानले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८, २४५४०९

# प्रहार दिव्यांग क्रांती व प्रहार जनशक्ती पक्ष, जिल्ह्याची आढावा बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न




धाराशिव (प्रतिनिधी)- बैठकीस प्रहार पक्षाचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष बल्लू झांजवळ, प्रहार दिव्यांगचे राज्याध्यक्ष धर्मेंद्रजी सातव, राज्य उपक्रम समन्वयक महेश बडे, तसेच धाराशिव संपर्क प्रमुख अमोल जगदाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली.

यावेळी सोलापूर प्रहार पक्षाचे सातलिंग स्वामी, संघटनेचे जिल्हाध्यक्ष मयुर काकडे तसेच पक्षाचे जिल्हाध्यक्ष वर्षद शिंदे यांची उपस्थिती होती.


बैठकीदरम्यान जिल्हा, तालुका व शाखास्तरावरील पदाधिकाऱ्यांच्या कार्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रत्येक विभागाचा अहवाल सादर करण्यात आला तसेच जिल्ह्यातील संघटना व पक्षाची सद्यस्थिती, भविष्यातील संघटनात्मक बांधणी आणि प्रहारच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या आगामी आंदोलन व विविध उपक्रमांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

बैठकीचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष मयुर काकडे यांनी केले, तर अध्यक्षीय समारोप बल्लू झांजवळ यांनी केला. बैठकीचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल जिल्हाध्यक्ष मयुर काकडे यांचा सर्व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या बैठकीस संघटनेचे सर्व जिल्हा, तालुका व शाखास्तरीय पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर बैठकीचे आयोजन प्रहारचे जिल्हाध्यक्ष मयुर काकडे यांनी केले.

या बैठकीसाठी जमीर शेख, महादेव चोपदार,अमोल शेळके, इंद्रजीत मिसाळ,बाबासाहेब भोयटे, औदुंबर भणगे, राजेंद्र आकाडे, सतिश कोळगे, पिंटू श्रीरसागर, शाहजी शेरखाने, रामभाऊ तांबे, दिपक गव्हाणे, कुमार नरवडे, अमोल पाडे पाटील, कृष्णा राऊत, मारुती कांबळे, पाडे बारीकराव माळी, मुरलीधर, गौतम दुधे, शिवाजीराव नेपते, मुख्तार पटेल, रंगनाथ बर्वे, विकास शिरसागर, शफिक पटेल, अर्जुन वाघमारे, सहदेव कांबळे, भुजंग चौरे, नानासाहेब वागे, अंकुश तावडे, रंजित शिंदे, दादासाहेब शिवलकर, पोपट शिंदे, बालाजी नवले, तानाजी शिंदे, नवनाथ कचार, संजय नाईकवाडी, बाळू गरगटे, आकाश गलांडे, अनिल बुटुकुडे, लहू दाणे, गजेंद्र वाघुलकर, शेख आशोद, दिनेश पोतदार, संदीप बारबोले,सब्दर सय्यद, इरफान वस्ताद, इस्माईल शेख, इंद्रजीत मिसाळ, बाळू गरगटे, आकाश गलांडे, संजय नाईकवाडी, नवनाथ कचार, शिवा पडवकर,मारुती पाटील,मेहबूब तांबोळी, पप्पा होगले, दत्ता पवार, बिभीषण गुंड, धनंजय खांडेकर, मारुती वाघमारे, यांनी परिश्रम घेतले.

# श्री कुलस्वामिनी आश्रम शाळा, जळकोट येथे गुढीपाडवा निमित्त पट वाढवा उपक्रम



नळदुर्ग (विजय पिसे)- श्री कुलस्वामिनी आश्रम शाळा, जळकोट येथे गुढीपाडवा या सणाचे औचित्य साधून गुडी पाडवा पट वाढवा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश गावातील पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे आणि विद्यार्थ्यांची शाळेत नावनोंदणी वाढवणे हा होता.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ जळकोट ते सचिव तथा प्राचार्य संतोष चव्हाण साहेब व श्री कुलस्वामिनी प्राथमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती आशा पवार मॅडम इंदिरा गांधी आदर्श माध्यमिक आश्रम शाळा होर्टी चे मुख्याध्यापक विनायक राठोड साहेब यांच्या हस्ते गुढी उभारून व ग्रंथांचे पूजन करून करण्यात आली.

त्यानंतर प्रभात फेरी मध्ये विद्यार्थ्यांनी घोषवाक्ये देत गावकऱ्यांचे लक्ष वेधले. प्रत्येक मुलाने शिक्षण घेतलेच पाहिजे हा संदेश देत गावात जनजागृती केली पालकांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपल्या मुलांना शाळेत दाखल करण्याचे आश्वासन दिले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुशंगाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ गुढी पाडवा प्रवेश वाढवा. मधील इयत्ता १ ली या वर्गाची सुरुवात इयत्ता पहिली प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी उत्साहामध्ये स्वागत करण्यात आले यावेळी महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ, जळकोट चे सचिव तथा प्राचार्य आदरणीय संतोष चव्हाण साहेब व प्राथमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती आशा पवार मॅडम यांनी पुष्पगुच्छ व खाऊ वाटप करुन तसेच शैक्षणिक साहित्य देऊन मुलांचे स्वागत केले. यावेळी प्राचार्य संतोष चव्हाण बोलताना आजच्या या कार्यक्रमाचे विशेष महत्त्व म्हणजे पट वाढवा उपक्रम. शिक्षण हे प्रत्येक मुलाचे मूलभूत हक्क आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे, ही आपली जबाबदारी आहे. आपल्या शाळेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, शिक्षणाच्या प्रवाहात सामील व्हावे, यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

पालकांनो, आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षण हा सर्वात मोठा पाया आहे. आपल्या मुलांना शाळेत नियमित पाठवा, त्यांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घ्या. शिक्षकवृंद देखील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी सदैव तत्पर आहेत.

विद्यार्थ्यांनो, तुम्हीच देशाचे भविष्य आहात. तुमच्या कष्टाने आणि प्रामाणिक प्रयत्नांनी तुम्ही मोठे यश संपादन करू शकता. नवीन वर्षात नवीन ध्येय निश्चित करा आणि त्यासाठी सातत्याने प्रयत्न करा.

चला, या गुडीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर आपण सर्वजण मिळून पट वाढवा हा संकल्प करूया आणि शिक्षणाचा प्रसार वाढवूया.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे शिक्षक श्री खंडेराव कारले, श्री अभिजीत चव्हाण सर, श्री संतोष दुधभाते ,श्री आप्पासाहेब साबळे, श्रीमती मीरा पवार मॅडम, श्रीमती शांताबाई चौगुले, श्रीमती कल्पना लवंद, श्रीमती अश्विनी लबडे, श्रीमती प्रमिला कुंचगे, श्री बाळासाहेब मुखम, श्री किरण ढोले, श्री देवानंद पांढरे ,श्री बिळेणसिद्ध हक्के, श्री बालाजी राठोड ,श्री दुर्गेश कदम, श्री सागर चव्हाण ,श्री अमितसिंग खारे, शंकरराव चव्हाण सहकार्य केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री किरण कांबळे सर यांनी केले व आभार कुमारी मयुरी कांबळे मॅडम मानले. अलियाबाद ग्रामस्थ यांचे विशेष सहकार्य लाभले. या उपक्रमामुळे शाळेच्या पटसंख्येत वाढ होण्यास मदत होईल, असा विश्वास गावकरी व्यक्त केले.

# राघरात लोकशाहीचा ठोका: BLO चा कडक SIR अभियान

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)-लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी निवडणूक यंत्रणा आता अधिक सक्रिय झाली असून, BLO (Booth Level Officer) यांच्या माध्यमातून SIR (Special Intensive Revision) अंतर्गत घराघरात जाऊन मतदार पडताळणी मोहीम जोरात सुरू झाली आहे. या मोहिमेत BLO अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या असून, प्रत्येक कुटुंबाची प्रत्यक्ष भेट घेऊन सखोल माहिती व कागदपत्रांची खातरजमा करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

**काय कागदपत्रे घेतली जाणार?**

या मोहिमेदरम्यान इङज कडून खालील माहिती व कागदपत्रे संकलित केली जाणार आहेत:

आधार कार्ड: कुटुंबातील सर्व मतदारांचे आधार कार्ड अनिवार्य

रंगीत फोटो: आवश्यक असल्यास मोबाईलद्वारे स्पष्ट पासपोर्ट फोटो

जन्मतारीख बदल: शालेय पुरावा किंवा पॅन कार्ड

पत्ता पुरावा: लाईट बिल / ग्रामपंचायत / नगरपरिषद ८-अ

मोबाईल नंबर: सर्व मतदारांचे अद्ययावत संपर्क

विवाहित महिलांची माहिती: माहेरकडील संपूर्ण तपशील व संपर्क

२००२ यादीत नाव नसल्यास: सखोल चौकशी व माहिती नोंद

**BLO साठी विशेष सूचना**

प्रत्येक इङज ने स्वतंत्र रजिस्टर ठेवणे बंधनकारक सर्व माहिती व्यवस्थित नोंदवणे आवश्यक कागदपत्रांची पडताळणी केल्याशिवाय मॅपिंग करू नये

प्रत्येक घरभेटीचा -पसशश्र उरा / ऋझड फोटो काढणे अनिवार्य

**कडक अंमलबजावणी - चूक चालणार नाही!**

ही मोहीम केवळ औपचारिक नसून, मतदार यादीतील त्रुटी दूर करून पारदर्शक निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करण्याचा मोठा प्रयत्न आहे. त्यामुळे इङज अधिकाऱ्यांना कोणतीही ढिलाई न करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**जनतेला आवाहन**

नागरिकांनीही या मोहिमेत सहकार्य करणे अत्यंत गरजेचे आहे. योग्य कागदपत्रे उपलब्ध करून देऊन आपले नाव अचूक व सुरक्षित ठेवणे ही प्रत्येक मतदाराची जबाबदारी आहे.

आपला मतदान हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी आजच सज्ज व्हा - कारण प्रत्येक मत महत्त्वाचे आहे!

## 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२३ मार्च रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण १६२ कारवाया करुन १,३९,०५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# ज्ञानगुढी उभारून नवोदित विद्यार्थ्यांचा सत्कार
# भाटशिरपुरा शाळेत विद्यार्थ्यांचे अनोखे स्वागत

कळंब(प्रतिनिधी)- नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाटशिरपुरा येथे गुढीपाडव्याच्या निमित्ताने 'प्रवेश वाढवा' अभियानांतर्गत अनोख्या पद्धतीने विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. पारंपरिक संस्कृतीचा सन्मान राखत शाळेत ज्ञानाची (पुस्तकाची) गुढी उभारून इयत्ता पहिलीत प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, साखरेचे हार व टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आपलेपणा व उत्साह निर्माण झाला असून पालकांकडूनही या उपक्रमाचे कौतुक होत आहे. यावेळी नवोदित २० विद्यार्थ्यांना साखरेचा हार, गुलाब पुष्प तसेच लेखन साहित्य देऊन सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने, राष्ट्रीय प्राथमिक शिक्षक महासंघाच्या संकल्पनेतून गेल्या वर्षापासून संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात 'गुढीपाडवा प्रवेश वाढवा' हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत गुढीपाडव्याच्या दिवशी प्रवेशपात्र विद्यार्थ्यांना शाळेत दाखल करून त्यांचे स्वागत केले जाते. त्यानुसार दि. २३ रोजी भाटशिरपुरा येथील शाळेत हा उपक्रम उत्साहात पार पडला.

या प्रसंगी उपसरपंच सूर्यकांत खाते, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुशील गायकवाड, उपाध्यक्ष तैमूरलंग शेख तसेच रमेश रितपुरे, विक्रम गायकवाड, हनुमंत सावंत, आमिर शेख, संदीप गायकवाड, वैभव गायकवाड, समीर शेख, बलभीम सावंत, मनीषा अतुल गायकवाड, अंजना राम रतन भालेकर, अश्विनी धनंजय शिंदे, सोनाली जितेंद्र शेळके यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीकांत तांबारे, सचिन तामाने, नागेंद्र होसाळे, अमोल बाभळे, लिंबराज सुरवसे, राजाभाऊ शिंदे, परमेश्वर वाघमोडे, कालींदा मुंडे व राजकन्या तोडकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक बाळकृष्ण तांबारे यांनी केले. सूत्रसंचालन श्रीकांत तांबारे यांनी तर आभार प्रदर्शन श्रीमती राजकन्या तोडकर यांनी केले.

# ग्राम सुरक्षा दलाच्या माध्यमातून तरुणांची गावाच्या रक्षणाची तयारी

लोहारा(प्रतिनिधी)- लोहारा तालुक्यातील हराळी येथील काही दिवसांपूर्वी चोरीच्या घटना घडल्या होत्या. या घटनांना टाळण्यासाठी गावातील युवक, नागरिकांनी एकत्र येत रात्रीच्या वेळी गावात पहारा देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार याठिकाणी ग्राम सुरक्षा दलाच्या माध्यमातून पहारा देण्यात येत आहे.

तालुक्यातील हराळी गावात काही घरात एकाच रात्री चोरीची घटना घडल्यामुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेनंतर गावातील ग्रामस्थांनी एकत्र येत गावाच्या सुरक्षेसाठी ग्राम सुरक्षा दलाच्या माध्यमातून रात्रीचा पहारा सुरू केला आहे. दररोज पाळीने पाच जणांची टीम संपूर्ण हराळी गावात रात्री गस्त घातली जात आहे. गावात कोणतीही संशयास्पद हालचाल होऊ नये, यासाठी ग्रामस्थ सतर्क राहून पहारा देत आहेत. या उपक्रमाला पोलिस ठाण्याकडून सहकार्य मिळत असून, रात्रीच्या वेळी पोलिस कर्मचारीही गाडीसह राउंडला येतात. गावातील नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने गावाच्या सुरक्षेसाठी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे गावात सुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

हराळीप्रमाणे इतर गावांनीही उपक्रम राबवावा लोहारा पोलिस ठाण्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक विजय पवार म्हणाले, हराळीतील युवक, नागरिकांनी घेतलेला निर्णय स्तुत्य आहे. गावच्या सुरक्षेसाठी आपणच पुढाकार घेतला तर अशा घटना घडणार नाहीत. गावात एखादा संशयित व्यक्ती फिरत असेल किंवा काही संशयित हालचाली दिसून येत असतील तर गावकऱ्यांनी तत्काळ पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा. तसेच ज्या पद्धतीने गावच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हराळी ग्रामस्थांनी निर्णय घेतला आहे, त्याच पद्धतीने तालुक्यातील इतर गावांनीही असा निर्णय घ्यावा.

**HIGH-POWERED SALE COMMITTEE**
**(CONSTITUTED BY THE HON'BLE SUPREME COURT OF INDIA)**
Office Address: 4th Floor, Plot No. 226, A-2, Sector-17, Dwarka, New Delhi-110075 Telephone-011-40073576

**PUBLIC NOTICE**

NOTICE OF SALE FOR E-AUCTION OF IMMOVABLE PROPERTIES OF SAI PRASAD GROUP OF COMPANIES

1. The High-Powered Sale Committee has been constituted by the Hon'ble Supreme Court of India vide order dated 15 July 2024 passed in Writ Petition (Crl) No.546 of 2023 in the matter of Balasaheb Keshawrao Bhapkar & Ors. Vs Securities and Exchange Board of India.

The Committee has been constituted to liquidate the assets of Sai Prasad Group of companies in line with directions of the Supreme Court vide order dated 19.02.2025 (para 5 (iii) by way of e-auction of 46 properties in Maharashtra (1 in Mumbai, 2 in Nashik, 35 in Osmanabad / Dharashiv, 6 in Pune & 2 in Thane) and 1 property in Jharkhand (Ranchi) and consequently issued Request for Proposals (RFP) which can be accessed along with property documents at:

www.bankeauctionwizard.com
www.hpsc-saiprasad.com

2. Details for participation in e-auction are available in RFP. Key dates of RFP are as follows:

- **Date of Publication of RFP - 25th March, 2026**
- **Bid Due Date and Time for RFP - 15th April 2026 till 4.00 PM**
- **Start Date/Time of e-Auction - 30th April, 2026 at 11.00 AM**

**APPLICABLE CONDITIONS:**

3. All properties will be sold on an "as is, where is, whatever there is" basis and the purchaser will be responsible for all claims, liabilities and/or encumbrances relating thereto.

4. The details of the Properties as stated in this Notice and the RFP under this Tender Document are as per the details made available to the Seller and neither the Seller nor the Agency shall, in any way, be responsible for any variation in the extent of the Properties due to any reason.

5. The committee will in no manner be responsible for any discrepancy in the properties/their title deeds and bidders are requested to submit their bids only after conducting their own independent due diligence exercise with respect to the title to the properties.

6. The interested bidders, who require assistance may contact on email id: hpsc.saiprasad@stockholdingdms.com or Ms. Snehal Patil, Deputy Manager, StockHolding DMS 022-61778742

CBC 15204/11/0270/2526

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649